मंगळवार, ५ जुलै २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ३४८
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

चोळईत दरड कोसळली; नागरिकांचे स्थलांतर/२
रानबाजिरे धरणातील बॅकवॉटर कमी करण्यासाठी प्रयत्न/५
भारताकडे मोठी आघाडी; इंग्लंडसमोर आव्हान/८

## महाडमधील सखल भागांत पुराचे पाणी शिरले



**महाड** : येथे पडत असलेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे सावित्री नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून बिरवाडीसह महाडच्या सखल भागांत सोमवारी (दि. ४) पुराचे पाणी शिरले. महाड तालुक्यात सकाळी ११ वाजल्यापासून मुसळधार पावसाने सुरुवात केली. या पावसामुळे सावित्री, काळ आणि गांधारी नदीने धोक्याची पातळी ओलांडली. सावित्री नदीची पातळी पाच मीटरपेक्षा वर गेल्याने महाड पालिकेने भोंगा वाजवून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे व्यापाऱ्यांनी आपापले सामान हलविण्यास सुरुवात केली, तर महामार्गालगत मोऱ्यांमधून पाण्याचा निचरा होत नसल्याने गांधारपाले गावात १५ ते २० घरांत पाणी शिरले. दस्तुरी नाका-नाते खिंड मार्गावरही ठिकठिकाणी पाणी साचले. दरम्यान, राज्यातील नव्या सरकारच्या तत्परतेमुळे एनडीआरएफची तुकडी महाडमध्ये दाखल झाली आहे.

# नव्या सरकारवर शिक्कामोर्तब!

**मुंबई : प्रतिनिधी**

**विधानसभा अध्यक्षपद निवडणुकीच्या निमित्ताने शिंदे-फडणवीस सरकारने पहिली लढाई जिंकल्यानंतर आता विश्वासदर्शक ठरावही जिंकला आहे. या वेळी भाजप, शिंदे समर्थक व अपक्ष यांना मिळून एकूण १६४ मते मिळाली, तर महाविकास आघाडीला ९९ मते पडली. तीन आमदार तटस्थ राहिले, तर काहींना मतदानास उपस्थित राहता आले नाही.**

राज्यपालांच्या निर्देशानुसार दोन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलाविण्यात आले होते. पहिल्या दिवशी भाजपच्या राहुल नार्वेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सोमवारी दुसऱ्या दिवशी विश्वासदर्शक ठराव मांडण्यात आला. सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेल्या विश्वासदर्शक ठरावाला भरत गोगावले यांनी अनुमोदन दिले. सुरुवातीला आवाजी मतदान झाल्यानंतर प्रत्यक्ष मतमोजणी करण्यात आली. या वेळी शिंदे-फडणवीस सरकारने १६४ मतांसह बहुमताचा आकडा पार केला. महाविकास आघाडीला अवघी ९९ मते पडली.

काँग्रेस आमदार प्रणिती शिंदे, जितेश अंतापुरकर सलग दुसऱ्या दिवशी गैरहजर होते. समाजवादी पक्षाचे अबू आझमी व रईस शेख तसेच एमआयएमचे शाह फारुख अन्वर हे आमदार तटस्थ राहिले, तर अशोक चव्हाण, विजय वडेट्टीवार, झिशान सिद्दीकी, धीरज देशमुख उशिरा आल्याने त्यांना सभागृहात प्रवेश मिळाला नाही.

राज्यात राजकीय घडामोडींनंतर राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार पडले आणि भाजप युतीचे सरकार आले. यानंतर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली, तर भाजप नेते देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. शिंदे-फडणवीस सरकारने आपल्याकडे बहुमत असून सहजपणे विश्वासदर्शक ठराव जिंकू असे म्हटले होते. त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### आणखी एक शिवसेना आमदार शिंदे गटात

आतापर्यंत शिवसेनेच्या ठाकरे गटाची बाजू लढवणारे आमदार संतोष बांगर सोमवारी एकनाथ शिंदे गटात दाखल झाले. सकाळी ते थेट शिंदे गटाच्या बसमध्ये चढले. त्यांची रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसोबत चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे.

## विश्वासदर्शक ठरावही मोठ्या फरकाने जिंकला



## सर्वांना संधी मिळते -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



राज्यातील नव्या सरकारने विश्वासदर्शक ठराव जिंकल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अभिनंदन व कौतुक केले. या वेळी त्यांनी सर्वांना संधी मिळते, असे म्हणत मी पुन्हा येईन वाक्यावरून टिंगलटवाळी करणाऱ्यांना उत्तरही दिले आहे.

फडणवीस म्हणाले, महाविकास आघाडी सरकार टिकणार नाही असे म्हटल्यानंतर अनेकांनी माझी टिंगलटवाळी केली. मी पुन्हा येईन म्हटले होते. मी पुन्हा केवळ आलोच नाही, तर यांनाही घेऊन आलो आहे. ज्यांनी अपमान, टिंगलटवाळी केली त्यांचा मी बदला घेणार. मी त्यांना माफ केले हाच माझा बदला आहे. राजकारणात अशा गोष्टी मनावर घ्यायच्या नसतात. सर्वांना संधी मिळते.

काही लोकांना आम्ही सत्तेसाठी काही करीत आहोत असे वाटले होते. सत्ता आमचे साधन आहे. सामान्य माणसाच्या जीवनात सामाजिक, आर्थिक परिवर्तन करण्यासाठी उपकरण म्हणून आम्हाला सत्ता हवी आहे, असे फडणवीस म्हणाले.

माझ्या नेत्याने मला उपमुख्यमंत्री म्हणून काम करण्यास सांगितले. ज्या पक्षाने मला सर्वोच्च स्थानावर बसवले त्यांनी घरी बसण्यास सांगितले असते तर तेही केले असते, असे सांगून फडणवीस पुढे म्हणाले की, एकनाथ शिंदेंच्या पाठीशी पूर्ण ताकद आणि क्षमतेने मी उभा आहे. कारकीर्द अधिक यशस्वी करण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे.

## राज्यात पेट्रोल-डिझेल स्वस्त होणार; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पहिली घोषणा

**मुंबई** : नव्या सरकारने विश्वासदर्शक ठराव जिंकल्यानंतर सत्ताधारी व विरोधी पक्षातील आमदारांची अभिनंदनपर भाषणे झाली व शेवटी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाषण केले. या वेळी त्यांनी दोन महत्त्वपूर्ण घोषणा केल्या, ज्यामध्ये इंधनावरील व्हॅट कमी करण्यासाठी लवकरच कॅबिनेटमध्ये निर्णय घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या हिरकणी गावाच्या सर्वांगिण विकासासाठी २१ कोटी रुपयांचा निधी देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमती वाढल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केंद्रीय कर कमी केला होता. पंतप्रधानांनी विनंती केली होती की, सर्व राज्यांनी व्हॅट कमी करावा. त्यानुसार इतर राज्यांनीदेखील व्हॅट कमी केला होता, पण महाराष्ट्राने पाच पैसेदेखील कमी केले नव्हते. आता आमचे युतीचे सरकार हा व्हॅट कमी करण्याचा निर्णय लवकरात लवकर घेणार आहे. याशिवाय हिरकणी गाव वाचवण्यासाठी शासनाच्या माध्यमातून २१ कोटींचा निधी देणार असल्याची मी घोषणा करतो.

या राज्यातील सर्वांत महत्त्वाचा जो घटक आहे तो म्हणजे बळीराजा. जो जगला पाहिजे. या शेतकऱ्याच्या जीवनातदेखील सुखाचे क्षण यावेत म्हणून शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र आम्हाला करायचा आहे. यासाठी विरोधी पक्षांचे, सगळ्यांचे योगदान आणि सहकार्य आम्हाला लागेल. सत्ताधारी व विरोधी पक्षाने हातात हात घालून काम करूयात, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या वेळी म्हणाले.

- **शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करण्याचा सरकारचा निर्धार**
- **रायगडातील हिरकणी गावाच्या विकासासाठी २१ कोटींचा निधी**

## निवडक

### हिमाचलमध्ये बस दरीत कोसळून १६ प्रवाशांचा मृत्यू

**शिमला** : हिमाचल प्रदेशमधील कुल्लूत बस दरीत कोसळून १६ प्रवाशांचा मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. कुल्लूतील सांज दरी येथील जंगला गावाजवळ सोमवारी (दि. ४) सकाळी ८च्या सुमारास हा अपघात झाला. मृतांमध्ये विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती चिंताजनक आहे.

### परशुराम घाटातील वाहतूक मुसळधार पावसामुळे बंद

**चिपळूण** : मुंबई-गोवा महामार्गावरील चिपळूणजवळील परशुराम घाटातील वाहतूक मुसळधार पावसामुळे बंद करण्यात आली आहे. दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री दरड कोसळून हा घाट वाहतुकीसाठी बंद झाला होता. सध्या हलक्या वजनाची वाहतूक कळंबस्ते-आंबडस-लोटेमार्गे वळविण्यात आली आहे.



## नवीन पनवेलमध्ये उद्यान नूतनीकरण, सुशोभीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिका क्षेत्रात विकासाची अनेक कामे होत आहेत. त्यानुसार नवीन पनवेल सेक्टर ३ आणि ४मध्ये उद्यान नूतनीकरण व सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन रविवारी (दि. ३) महापौर डॉ. कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

### महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

पनवेल महापालिका क्षेत्रातील प्रभाग १६ नवीन पनवेलमधील प्लॉट नंबर ५६ व ५७, सेक्टर ४, प्लॉट नंबर २२९ येथील उद्यानांचे नूतनीकरण व सुशोभीकरण करण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते झाले. **(पान २ वर..)**

## कुंडलिका नदीत बुडून पर्यटकाचा मृत्यू

### माणगावमधील घटना; दोघांना वाचविण्यात यश

**माणगाव : प्रतिनिधी**

पर्यटनासाठी माणगाव तालुक्यात आलेल्या ग्रुपमधील एका तरुणाचा कुंडलिका नदीत बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. ३) घडली, तर त्याच्या दोन सहकाऱ्यांना वाचविण्यात यश आले आहे.

मुंबई-ठाणे येथून १७ पर्यटक रविवारी वर्षासहलीसाठी माणगाव तालुक्यात आले होते. भिरा येथील देवकुंड परिसर पाहून झाल्यानंतर परतताना यातील दिनेश तुकाराम शिंदे (वय २४. रा. पिंपरी गाव, दहिसर मोरी, ठाणे), संदीप तांबेकर व हर्षद मेंदे हे तिघे म्हसेवाडी गावाजवळील कुंडलिका नदीपात्रात पोहण्यासाठी उतरले, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडू लागले. या वेळी संदीप तांबेकर व हर्षद मेंदे यांना वाचविण्यात त्यांच्या उर्वरित सहकाऱ्यांना यश आले, मात्र दिनेश शिंदे या तरुणाचा बुडून मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या घटनेची नोंद करण्याचे काम माणगाव पोलीस ठाण्यात सुरू होते.

## तळा आनंदवाडीत इनोव्हाच्या अपघातात दोन ठार, दोघे जखमी

**तळा : प्रतिनिधी**

तळा आनंदवाडी येथे सोमवारी (दि. ४) सकाळी इनोव्हा गाडीचा अपघात होऊन दोन जणांचा मृत्यू झाला असून अन्य दोघे जखमी झाले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी वाहनचालकाला ताब्यात घेतले आहे.



तळ्याकडून इंदापूरकडे इनोव्हा गाडी (एमएच ४६-डब्ल्यू ५१७७) घेऊन जात असताना चालक जयेंद्र पारावे (रा. बडदाड वाडी) याचा वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात झाला. या अपघातात आनंदवाडी येथील अंगणवाडीतील सेविका प्रज्ञा प्रशांत सकपाळ (वय ३२), सारिका संदीप जाधव (वय ५), रियांश गणेश पवार (वय ५) आणि रिया गणेश पवार (वय ४) हे सर्व गाडीखाली सापडले. त्यातील प्रज्ञा सकपाळ आणि सारिका जाधव यांचा जागीच मृत्यू झाला, तर रियांश आणि रिया यांना गंभीर दुखापत झाली आहे. रियांशला अलिबाग येथील आणि रियाला माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, गाडीचालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तो मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होता, अशी माहिती समोर आली आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## पनवेलमध्ये दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'भरारी २०२२'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एमकेसीएल अर्थात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित रायगड विभागाच्या वतीने दहावी, बारावी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिर भरारी २०२२-तुमच्या करिअरला द्या एक परिपूर्ण भरारी गुरुवारी (दि. ७) पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

दहावी, बारावी व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांकरिता पनवेल तालुक्यातील सर्व एमएस-सीआयटी केंद्रांच्या माध्यमातून हे मार्गदर्शन शिबिर विनाशुल्क आयोजित केले आहे, अशी माहिती 'एमकेसीएल'चे कोकण विभागीय समन्वयक जयंत भगत यांनी दिली. या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका आयुक्त गणेश देशमुख, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्रातील नामवंत शिवव्याखाते, लेखक व करिअर मार्गदर्शक प्रशांत देशमुख विद्यार्थ्यांना या निमित्ताने मार्गदर्शन करणार आहेत, तर एमकेसीएलचे वरिष्ठ व्यवस्थापक दीपक पाटेकर हे प्रत्यक्ष कार्यानुभवातून पदवी कशी मिळवावी या संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. बीबीएपासून ते बीएस्सी कम्प्युटर सायन्स या पदव्यादेखील आपण काम करता-करता कशा मिळवू शकतो या संदर्भात कमवा आणि शिका तसेच एमकेसीएलचे जॉब स्कील कोर्सेस (क्लिक कोर्स) याबद्दल आपल्याला माहिती कळू शकेल. त्याचप्रमाणे दहावी व बारावीच्या विद्यार्थांचा गुणगौरव सोहळा मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

एमकेसीएलच्या माध्यमातून एमएस-सीआयटीबरोबरच एकविसाव्या शतकामध्ये आवश्यक असलेले अत्याधुनिक डिजिटल स्कील मार्गदर्शन, दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर मोफत मार्गदर्शन करण्याचे काम जिल्ह्यातील सर्व एमएस-सीआयटी आणि क्लिक सेंटरच्या माध्यमातून होत आहे.

### करिअर मार्गदर्शन शिबिर आणि गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा

## शिवसेना नेते संजय राऊतांना कोर्टाचा दणका; वॉरंट जारी



**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांना न्यायालयाने दणका दिला आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नीने राऊत यांच्या विरोधात दाखल केलेल्या मानहानी दाव्याप्रकरणी कोर्टाने राऊतांना वॉरंट जारी केले आहे.

संजय राऊत यांनी काही दिवसांपूर्वी एका पत्रकार परिषदेत सोमय्या यांच्या कुटुंबीयांवर आणि त्यांच्या सामाजिक संस्थेविरोधात भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. मिरा-भाईंदर महापालिकेच्या क्षेत्रात टॉयलेट बांधणीच्या कामात गैरप्रकार झाल्याचा आरोप राऊत यांनी केला होता. त्यानंतर सोमय्या यांच्या पत्नी मेधा यांनी राऊत यांच्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केला होता. या प्रकरणी कोर्टाने राऊत यांना कोर्टाने हजर राहण्याचे आदेश दिले होते, पण राऊत कोर्टात हजर न झाल्याने अखेर कोर्टाने त्यांना वॉरंट बजावले असून १८ जुलै रोजी या प्रकरणी पुढील सुनावणी होणार आहे.

दरम्यान, राऊत यांनी आधारहिन आणि धादांत खोटे आरोप केल्याबद्दल त्यांच्यावर खटल्याची कारवाई करावी, अशी मागणी सोमय्या यांच्याकडून करण्यात आली आहे.

## तारा, कर्नाळा अभयारण्य, चिंचवण, पळस्पे सर्व्हिस रोडवर पथदिवे लावा

### आमदार महेश बालदी यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तारा, कर्नाळा अभयारण्य, चिंचवण व पळस्पे सर्व्हिस रोडवर पथदिवे लावण्यात यावेत, अशी मागणी आमदार महेश बालदी यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रकल्प अंमलबजावणी युनिट पनवेल प्रकल्प संचालक श्री. घोटकर यांच्याकडे केली आहे.

या संदर्भात आमदार महेश बालदी यांच्या मागणीचे पत्र कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजू पाटील, माजी उपसरपंच विद्याधर जोशी यांनी संबंधित अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केले. आमदार महेश बालदी यांनी केलेल्या मागणीतील पत्रात म्हटले आहे की, तारा, कर्नाळा अभयारण्य, चिंचवण व पळस्पे या सर्व्हिस रोडवर स्थानिक ग्रामस्थांचा धार्मिक पालखी सोहळा मार्गक्रमण होत असतो तसेच रात्रीच्या वेळी अंधारात वाहनचालकांना वाहतूक करण्यास फार गैरसोय होत असते. अंधारामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. हे सर्व लक्षात घेता या ठिकाणी दोन्ही बाजूंना स्ट्रीट लाईट बसविण्यात यावे व तशी तातडीने कार्यवाही व्हावी.



# माझे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न

## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शिवसेना पक्षप्रमुखांवर आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

विधिमंडळाच्या दोन दिवसीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी शिंदे-भाजप गटाने विश्वासदर्शक ठराव जिंकला. अधिवेशनाचा दुसरा दिवस चांगलाच वादळी ठरला. सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांना खिंडीत गाठण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी आपल्या भाषाणामध्ये राज्यात घडलेल्या सत्तानाट्यावर भाष्य केले असून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले. माझे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला, असा आरोप एकनाथ शिंदे यांनी केला आहे.



गुजरातला जाताना एकही आमदार मुख्यमंत्र्यांना भेटून पुढे जाऊया, असे मला म्हणाला नाही. हा एका दिवसाचा कार्यक्रम नाहीये. सुनिल प्रभू यांना माहिती आहे की, माझे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न सुरू होता. तुम्ही साक्षीदार आहात. मी ठरवले की, जे होईल ते होऊदे, लढून शहीद झालो तरी चालेल, पण आता माघार नाही. शिवसेना वाचवण्यासाठी मी काहीही करायला तयार आहे. बाकीचे वाचतील, असे एकनाथ शिंदे आपल्या भाषणादरम्यान म्हणाले.

मी माझ्या आमदारांना सांगितले होते की, चिंता करू नका. ज्या दिवशी मला वाटेल की, तुमचे नुकसान होतेय, त्या दिवशी मी तुम्हाला सांगेन. तुमचे भवितव्य सुरक्षित करून मी या जगाचा निरोप घेऊन कायमचा निघून जाईन. ही छोटी घटना नाही. एक ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवकही इकडून तिकडे जाण्याची हिंमत करीत नाही. हे का झाले? कशासाठी झाले? का केले? या सर्वांच्या मुळाशी जायला हवे होते. याची कारणे शोधायला हवी होती, असेदेखील एकनाथ शिंदे म्हणाले.

माझी एवढी बदनामी करण्यात आली. माझ्याकडे चर्चेसाठी माणसे पाठवण्यात आली. तिकडे मला गटनेतेपदावरुन काढून टाकण्यात आले. हे सर्व बेकायदेशीरपणे करण्यात आले. एकीकडे चर्चा करायची आणि दुसरीकडे गटनेतेपदावरून काढून टाकायचे, पुतळे जाळायचे, घरावर दगडफेक करण्याचे आदेश द्यायचे. एकनाथ शिंदे यांच्या घरावर दगड मारण्याची हिम्मत करणार अजून जन्माला आलेला नाही, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

# मुंबई-गोवा महामार्गालगत चोळई येथे दरड कोसळली

## ७५ नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर





**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर तालुक्यातील सडवली ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील चोळई गावात गेल्या वर्षी उत्खनन झालेल्या ठिकाणी अपेक्षेप्रमाणे यंदा दरड कोसळली आहे. तालुका आपत्ती निवारण कक्षाने तातडीने घटनास्थळी जाऊन परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चोळईतील सुमारे ७५ नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर केल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार समीर देसाई यांनी दिली.

पोलादपूर तालुक्यात रात्रीपासूनच धुवाँधार पावसामुळे कशेडी घाटातील चोळई येथे दरड कोसळली. गेल्या वर्षी याठिकाणी उत्खननामुळे दरडीचा धोका लक्षात घेऊन चोळईच्या ग्रामस्थांनी उठाव केला होता. यंदा पावसाचा जोर वाढताच चोळई येथीलया उत्खननाच्या ठिकाणी दरडी कोसळून रस्त्यावर येण्यास सुरुवात झाली. प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत सुरक्षेचा उपाय म्हणून चोळई येथील २० कुटुंबांतील सुमारे ७५ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी विद्यामंदिर पोलादपूर येथे हलविले असल्याचा दावा केला आहे, मात्र, या ठिकाणी अनेक ग्रामस्थांनी जीवाच्या भीतीने आपआपल्या परगावातील नातेवाईकांच्या घरी आश्रय घेतल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

चौपदरीकरणाच्या कामामुळे डोंगराचा भाग कापण्यात आला असून पावसामुळे मातीचे ढिगारेच्या ढिगारे महामार्गावर खाली कोसळत असल्याने या गावाला धोका निर्माण झाला आहे. यामुळे पोलादपूर तालुका प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत येथील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे. यावेळी नायब तहसीलदार समीर देसाई, पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव यासह आपत्ती निवारण कक्षाचे अधिकारी, कर्मचारी, पोलीस कर्मचारी उपस्थित होते.


# मुसळधार पावसामुळे नेरळ येथील धरण ओव्हरफ्लो

**कर्जत : बातमीदार**

माथेरानच्या डोंगरातील पाणी मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात वाहून आल्याने नेरळ गावातील ब्रिटिशकालीन धरण तुडुंब भरून वाहू लागले आहे. गेल्या दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असल्याने बळीराजा आनंदी झाला असून शेतीच्या कामांना वेग आला आहे.

नेरळ गावाच्या मध्यभागी गणेशघाटाच्या बाजूला ब्रिटिशकालीन धरण असून त्या धरणात माथेरानच्या डोंगरातील पाणी येत असते. त्यामुळे माथेरानच्या डोंगरात सतत दोन-तीन दिवस पाऊस सुरू असल्यास हे धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागते. सोमवारी (दि. ४) सकाळपासून माथेरानच्या डोंगर भागात मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यात नेरळमध्येदेखील पावसाची संततधार सुरू असल्याने धरण भरून वाहू लागले आहे.

धरणाच्या भिंतीवरून वाहणारे पाणी पाहण्यासाठी नेरळकरांनी गर्दी केली होती. त्यात मासे पकडण्यासाठीदेखील मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली.



# श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटनस्थळांवरही कलम १४४ लागू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक श्रीवर्धन तालुक्यातील धबधबे किंवा तलावाच्या ठिकाणी येतात व दुर्दैवाने काही प्रमाणात जीवितहानी होण्याच्या घटना घडतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच धबधबा, धरण व तलाव क्षेत्रात कोणत्याही प्रकारे जीवितहानी होवू नये, याकरिता श्रीवर्धन, हरेश्वर, मारळ, दिवेआगार, कोंडिवली व शेखाडी तसेच श्रीवर्धन तालुक्यातील धरण असलेली गावे कुडकी, कार्ले, कोंढे पंचतन व सर्वे या गजबजलेल्या पर्यटनस्थळांच्या ठिकाणी व त्यांच्या १ किमी. परिसरात कलम १४४ (१)नुसार बंदी लागू करण्यात आली आहे.

अत्यावश्यक सेवा वगळून धबधब्याच्या १ किमी. परिसरात सर्व वाहनांना प्रवेश, कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणात असून सोशल डिस्टसिंगचे काटेकोरपणे पालन करणे या सर्व बाबींसाठी ९ ऑगस्टपर्यंत श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

**Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/ Ten-7/22-23 (RFX No. 7000023875)**

**Period for submission of E-Bid: 04.07.2022 to 11.07.2022 up to 23:59 hrs**

**Name of Work : Providing and Fixing of Electrical Insulating, Acid & Alkali Proof Mats and Painting of floor by Self level epoxy coating at 400kV RS, Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs) | Tender Fee (Rs) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. 9,34,443.70/- (Including GST) | Rs. 9,344.44/- | Rs.500/- + GST | **11.07.2022** up to 23:59 hrs | **12.07.2022** at 10:00 hrs (If possible) | **12.07.2022** at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. S.O.Katkar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 7666127972
2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their Bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**


# कृषी विभागाच्या माध्यमातून जांभिवली येथे शेतकरी कॅम्प

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील ग्रामपंचायत जांभिवली येथे कृषी विभागाच्या माध्यमातून शेतकरी कॅम्प झाला. महाडीबीटी अंतर्गत एक अर्ज, विविध योजनांबाबत माहिती या वेळी शेतकऱ्यांना देण्यात आली.



शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता चाचणी, मग्रारोहयो फळबाग लागवड फॉर्म भरून कागदपत्रे जमा करण्यात आली, हळद लागवडीबद्दल मार्गदर्शन, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग, तसेच पीएम किसान योजना ई-केवायसी ३१ जुलैच्या आत करून घेण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले.

माती परीक्षण नमुना घेणे व त्याचे महत्त्व शेतकऱ्यांना या वेळी पटवून देण्यात आले. या कार्यक्रमाला जांभिवली येथील ग्रामस्थ शेतकरी बांधव उपस्थित होते. जांभिवली गावचे सरपंच रवींद्र कोंडिलकर यांच्या हस्ते बायोला व भाजीपाला मिनीकीटचे वाटप करण्यात आले. या कॅम्पला कृषी मित्र दत्तात्रेय कोंडीलकर व लक्ष्मण पाटील यांनी मोलाचे सहकार्य लाभले. कृषी सहाय्यक दिनेश ढालपे व प्रसाद पाटील यांनी कृषी विभागातील विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले.

## पालखी दर्शनासाठी गेलेला १३ वर्षीय मुलगा बेपत्ता

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे-सोलापूर रस्त्यावर सोरतापवाडी परिसरात पालखी दर्शनासाठी गेलेला १३ वर्षीय मुलगा बेपत्ता झाला आहे. कैलास ब्रिजलाल गौतम (वय १३) असे बेपत्ता झालेल्या मुलाचे नाव आहे. त्याचे वडील ब्रिजलाल गौतम यांनी यासंदर्भात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

ब्रिजलाल गौतम सोरतापवाडीत पत्नी आणि मुलगा कैलाससह राहतात. २५ जून रोजी कैलास श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी गेला होता. त्यानंतर कैलास बेपत्ता झाला. त्यामुळे गौतम दाम्पत्याने पोलिसांकडे तो बेपत्ता झाल्याची तक्रार दिली.

## सारसई येथे कृषी संजीवनी मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील सारसई येथे कृषी संजीवनी मोहीम कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी खारभूमी संशोधन केंद्र कृषि विद्यावेत्ता डॉ. मनोज वहाणे, विजयकुमार खाडे, आर. आर. पाचपुते, मंडळ कृषी अधिकारी पनवेल यांनी आदिवासी शेतकरी बांधवांना रानभाज्यांबद्दल तसेच कृषी विभागाच्या योजनांची माहिती दिली. आत्मांतर्गत परसबाग भाजीपाला किट वाटप केले. या वेळी ग्रामपंचायत सदस्या मनीषा वाघे, टी. एन. दोलतोडे, प्रिती बोराडे, कृषी सहाय्यक प्रसाद पाटील उपस्थित होते.




पान १ वरून

## नवीन पनवेलमध्ये उद्यान नूतनीकरण, सुशोभीकरण

या भूमिपूजन कार्यक्रमास उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, नगरसेविका राजश्री वावेकर तसचे किशोर चौतमोल, महेंद्र वावेकर, मयूर आंग्रे, अक्षय सिंग, राहुल शिंदे, यमुना प्रकाशन, विठाबाई सावंत, संतोष बेन यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/सचिव/२१-२२/प्र.क्र.३०/१५२ /२२ दिनांक :- ०४/०७/२०२२

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका**
**सभा सूचना क्र.५०, दिनांक ०६/०७/२०२२**

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका बुधवार, दिनांक ०६/०७/२०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता पनवेल महापालिकेचे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या ठिकाणी खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस उपस्थित राहावे.

**सभा सूचना क्र. ५० दिनांक ०६/०७/२०२२ ची**
**पुरवणी विषय पत्रिका**

**३) मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज**
**(मुळ विषयपत्रिकेमध्ये विषय क्र. ०१ ते १३ समाविष्ठ आहेत.)**

१४) पनवेल महानगरपालिका हद्दीत बेकायदेशीरपणे सोडून दिलेली वाहने/बेवारस वाहनांवर कारवाई करणेकामी ठेकेदार नियुक्त करणे करीता ०३ वर्षे कालावधीकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.
१५) पनवेल महानगरपालिका हद्दीतील इच्छापूर्ती गणपती मंदिर पनवेल येथील अंतिम भूखंड क्र.३८८ मध्ये बहुउद्देशीय स्पोर्टस कॉम्पलेक्स व सभागृह विकसीत करणे करीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
१६) पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध उद्याने विकसित करणे कामी शासनाकडून निधी मागणी करणे बाबत.

( मा. महापौर महोदया यांचे मंजुरीने व आदेशान्वये )
महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- ०४/०७/२०२२

**सही/-**
**(विनायक बारशे)**
**नगर सचिव (प्र.)**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**



**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**
**माथेरान, ता. कर्जत, जिल्हा रायगड. ४१० १०२**
**ई-मेल आयडी :** mcomatheran@gmail.com

जावक क्र.:- मागिनप/७८१/२०२२-२३ दिनांक : ०४/०७/२०२२

**जाहीर नोटीस**

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप-२०२२/प्र. क्र. ५/का.६, दि. १० जून २०२२ अन्वये राज्यातील २०८ नगरपरिषदा व १३ नगरपंचायतीमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम २०२२ जाहिर करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमानुसार रायगड जिल्हयातील माथेरान नगरपरिषदेची प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी दि. ०५/०७/२०२२ पासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://raigad.gov.in या सांकेतीक स्थळावर व माथेरान नगरपरिषदेच्या https://matheranmahaulb.maharashtra.gov.in या सांकेतीक स्थळावर आणि https://drive.google.com/drive/folders/1Uq_XYRYcH_ooTXE6OQrc-HMrFA_RRbPJ?usp=sharing या लिंकवर तसेच नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डवर दि. ०५/०७/२०२२ पासून पहावयास मिळतील.

**सही/-**
**(डॉ. महेंद्र कल्याणकर)**
**जिल्हाधिकारी रायगड, अलिबाग**



**ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय कसलखंड**
**ता. पनवेल, जिल्हा. रायगड**
**जाहीर निविदा**

आपणास कळविण्यात येते की, खालील प्रमाणे कामांसाठी सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेकडून सिलबंद निविदा मागविण्यात आहेत. तरी अधिकृत ठेकेदाराने दिनांक ०५/०७/२०२२ ते ११/०७/२०२२ रोजी दुपा. २.०० वा. पर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा १२/०७/२०२२ रोजी दुपारी ०१.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर अथवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा इसारा १% | सुरक्षा अनातन ५% | निविदा किंमत | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | यशवंत पाटील ते प्रकाश पाटील यांच्या घरापर्यंत रस्त्यास संरक्षण भिंत बांधणे. | ९९९७००.०० | ९९९७ | | ५०० | |
| २) | प्रकाश पाटील ते वासुदेव पाटील यांच्या घरापर्यंत रस्त्यास संरक्षण भिंत बांधणे. | ९९९३९०.०० | ९९९३ | | ५०० | |
| ३) | सुरेश पाटील ते अशोक गावे यांच्या घरापर्यंत रस्त्यास संरक्षण भिंत बांधणे. | ९९९९५०.०० | ९९९९ | | ५०० | |
| ४) | ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत CCTV कॅमेरे बसविणे. | --- | १००० | | ५०० | |
| ५) | ग्रामपंचायत कार्यालयासाठी इलेक्ट्रिक स्कूटर खरेदी करणे. | १२५००० | १००० | | ५०० | |
| ६) | मौजे आरिवली गणेश घाट दुरुस्ती करणे. | २१६०५२. | २१६० | | ५०० | |
| ७) | हर घर झेंडा अंतर्गत १.५*२ फुट झेंडा पुरविणे ९००, सुत, पॉलिस्टर, खादी,लोकर इत्यादी प्रकरचा विणलेले किवा मशीनद्वारे | | १००० | | ५०० | |
| ८) | ग्रामपंचायत अंतर्गत सिमेंट बाकडे पुरविणे. ३३ | | १००० | | ५०० | |

**टीप :-**
१. कामाचे अंदाजपत्रक व नकाशा दि. ०५/०७/२०२२ ते ११/०७/२०२२ रोजी दुपारी १ ते २ वाजे पर्यंत कार्यालयात पहायला मिळतील.
२. कामे व त्यांची बिले उपलब्ध निधी नुसार दिली जातील.
निविदेंच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.
१. सदर सर्व निवडींची प्रक्रिया ग्रामपंचायत मार्फत केली जातील.सदर निविदा नोटीस,सूचना, सुधीपत्रक,इत्यादी माहिती ग्रामपंचायत नोटीस बोर्ड वर उपलब्ध आहे.
२. निविदे सोबत ग्रामपंचायत कसळखंड या नावाने १% रकमेचा डी डी किंवा रोख रक्कम भरून त्यांची सामान्य पावती जोडणे आवश्यक आहे.
३. कोणतेही कारण न दाखविता निविदा नाकारण्याचे व स्विकारण्याचे अधिकार प्रसिद्धी धारकाने राखून ठेवला आहे.
४. काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाही होईल.
**५. सदर कामातून ५% सुरक्षा अनामत रक्कम बिलातून परसपर कपात केली जाईल.**
६. पॅन कार्ड,GST ची प्रत ग्रा.पं. कडे सादर करावी.
७. income Tax प्रतावाची प्रत ग्रा.प. कडे सादर करावी.
८. १०० रु बॉडपेपरवर प्रतिज्ञा पत्र ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावी
९. कमीत कमी विविध दर सादर करणाऱ्या कामगारास कामे देण्याचा विचार केला जाईल.
१०. तालुक्यातील व नोंदणीकृत स्थानिक ठेकेदारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. वरील सर्व अटी शर्ती या विकास कामासाठी आहेत. (लायसन्स द्वारे करावयाच्या कामची मर्यादा ओलांडली नसल्याबाबत दाखले.)
१४. कामाच्या साहित्याचे नमुने प्रयोग शाळेतून तपासून घ्यावेत. व त्यांच्या अहवालाची प्रत ग्रामपंचायतीस सादर करावी.

**सही/-**
**सौ. माधुरी अनिल पाटील**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कसळखंड**
**ता. पनवेल, जि. रायगड**

# नवीन पनवेलमध्ये आरोग्य केंद्र साकारणार

## पनवेल मनपा स्थायी सभेत मान्यता

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वतीने नवीन पनवेल (पू.) येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यास, पनवेलमधील महात्मा गांधी उद्यानाचे सुशोभीकरण, कळंबोली येथे प्रभाग कार्यालयाची उभारणी करण्यासह विविध विषयांना सोमवारी (दि. ४) झालेल्या स्थायी समितीत मान्यता देण्यात आली.

स्थायी समितीची सभा मुख्यालयातील आयुक्त दालनासमोरील सभागृहात स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेस सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह स्थायी समितीचे अन्य सदस्य, उपायुक्त सचिन पवार, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहायय्क आयुक्त वैभव विधाते, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, सचिव विनायक बारशे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ब, सेक्टर ७, भूखंड क्र. जी-१, नवीन पनवेल (पू.) येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम



करण्याकामी न्यूनतम दराच्या निविदेस मान्यता देण्यात आली. पनवेल शहरातील महात्मा गांधी उद्यानाचे सुशोभीकरण करणे व अनुषंगाने येणारी इतर कामे करण्याकामी वाढीव खर्चास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिका हद्दीतील वृक्षांची-झाडांची गणना करणेकामी न्यूनतम दराच्या निविदेस मान्यता देणेबाबच्या विषयास मंजुरी देण्यात आली. पालिका हद्दीतील विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार वार्षिक मंजुर दराने सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती करणे याकामी चालू व पुढील वर्षांकरिता आर्थिक तरतुदीस मान्यता मिळण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिकेसाठी कार, जीप, इनोव्हा, रिक्षा, बस, टेम्पो, ट्रक, रुग्णवाहिका व इलेक्ट्रिक (कार/ जीप) वाहने वाहनचालकासह तीन वर्षे कालावधीकरिता भाडेतत्वावर पुरविण्याच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

महापालिका क्षेत्रातील प्रभाग समिती अ प्र. क्र. २मधील पडघे गावातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे व समाजमंदिराचे बांधकाम करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली. खारघर गावामध्ये मूलभूत व पायाभूत सुविधा पुरविण्याच्या विषयास मंजुरी मिळाली.

महापालिका हद्दीतील प्रभाग समिती ब, कळंबोली येथील सेक्टर ८ 'ई'मधील भूखंड क्र. ६, ७ व ८ येथे प्रभाग कार्यालयाची उभारणी करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिकेमार्फत सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षासाठी व सन २०२३-२४ च्या निविदा मंजुर होईपर्यंतच्या कालावधीकरिता पनवेल पालिकेमार्फत साजरे करण्यात येणारे निवडणूक कार्यक्रम व इतर सर्व कार्यक्रमांकरिता लागणारे मंडप, खुर्च्या, बॅरकॅटींग व इतर निविदा पत्रकात नमूद केलेले साहित्य पुरविणे कामीच्या विषयासही स्थायी समितीने मंजुरी दिली.

# न्हावा, न्हावाखाडी शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात गेली तीन दशके उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोडतर्फे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना सोमवारी (दि. ४) राजिप शाळा न्हावा व न्हावाखाडी येथे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजप पनवेल तालुका चिटणीस जयवंत देशमुख, वाहतूक संघटना रायगड उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, न्हावा ग्रामपंचायत सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उलवे नोड उपाध्यक्ष सी. एल. ठाकूर, न्हावा ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, भाजप नेते अजय भगत, दर्शन ठाकूर, तुषार भोईर, मीनाक्षी पाटील, सुशीला पाटील, कमला म्हात्रे, अरुणा म्हात्रे, श्रीधर मोकळ, चंद्रकांत पाटील, विनोद पाटील, विजय घरत, उपाध्यक्ष अनंता ठाकूर, अनिल कोळी आदी उपस्थित होते.



## खुटारी व किरवलीतील शाळेतही उपक्रम

**पनवेल :** रायगड जिल्हा परिषदेच्या खुटारी येथील शाळेत व किरवली मराठी शाळेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सोमवारी (दि. ४) वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

खुटारी येथील शाळेत १२० विद्यार्थ्यांना तर किरवली येथील शाळेत ५० विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी भाजप पनवेल तालुका संघटक प्रभाकर जोशी, तळोजा विभाग अध्यक्ष विनोद घरत, तालुका उपाध्यक्ष चाहुशेठ पाटील, वॉर्ड अध्यक्ष नंदकुमार म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्ते हरिश्चंद्र म्हात्रे, ज्ञानेश्वर म्हात्रे, मच्छींद्र म्हात्रे, प्रमोद पाटील यांच्यासह खुटारी व किरवली ग्रामस्थ उपस्थित होते.





## निवडक

### रेल्वे प्रवासात मोबाइलची चोरी

**पनवेल :** येथे राहणाऱ्या एका महिला पोलिसांच्या मोबाइलची चोरी झाल्याची घटना रेल्वे प्रवासादरम्यान घडली आहे. अर्चना डोंबाळे या पनवेल येथे राहत असून त्या मुंबई पोलीस दलात कार्यरत आहेत. त्या कुर्ला येथून रेल्वेने पनवेल येथे घरी परतत होत्या. या प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या मोबाइलची चोरी केली.

### खारघरमध्ये मंदिरात चोरी

**पनवेल :** खारघर वसाहतीमध्ये असलेल्या अंबेमाता मंदिरात अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली आहे. खारघर सेक्टर ५ मध्ये असलेल्या आंबेमाता मंदिरात अज्ञात चोरट्याने चोरी करून तेथील काही दागिने व इतर वस्तू चोरून नेल्या आहेत. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



## अभिवादन



**पनवेल : नवभारताच्या, नवनिर्मितीचा नवविष्कार संपूर्ण जगापुढे अभिमानाने मांडणारे स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपच्या पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी पक्षाचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, कामगार नेते जितेंद्र घरत आदी उपस्थित होते.**

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कार्यशाळा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर, येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान म्हाविद्यालयात, नेट सेट परीक्षेच्या पेपर १ (सामान्य) या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धा परीक्षा समितीच्या वतीने अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा सोमवारी (दि. ४) सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत झाली. या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते म्हणून सी. के. टी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. आकाश पाटील, तसेच रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञाम्पलृान विभागाचे प्रा. महेश धायगुडे, वाणिज्य विभागाच्या प्रा. नम्रता पारीक यांनी विशेष वक्ते म्हणून सर्व उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्राचार्यांनी नेट-सेट परीक्षेचे महत्त्व सर्व उपस्थितांना पटवून दिले. कार्यशाळेच्या नावनोदणी प्रक्रियेसाठी इच्छूक असणाऱ्या प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच सुमारे ५८ उमेदवारांनी नावनोंदणी केली.

या वेळी आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयातील 'अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष'च्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आयोजकांचे कौतुक केले, तसेच कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# पनवेलमधील नागरी कामांचा आढावा

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीत मान्सूनपूर्व कामे वेगाने सुरू आहेत. यामधील काही कामे पूर्ण झाली असून काही कामे अंतिम टप्प्यात आहेत. याच पार्श्वभूमीवर साई नगर, पंचरत्न, बावन्न बंगला, आदर्श सोसायटी या ठिकाणी नालेसफाईच्या कामांची तसेच रस्ते आणि गटारांच्या कामाची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी (दि. ४) पाहणी करून आढावा घेतला. तसेच या कामासंदर्भात अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

या वेळी नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, मनोहर म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेटकर, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, नगरसेविका हेमलता म्हात्रे, गणेश पाटील, दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, उज्वला पाटील कार्यकारी अभियंता संजय कटेकर यांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# बाप-लेकीचा प्रामाणिकपणा

## ज्येष्ठांकडून कौतुक

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल परिसरातील एका रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणाबद्दल अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघातील सदस्यांनी कौतुक केले आहे. रिक्षाचालक व त्याच्या मुलीने रविवारी (दि. ३) एका महिलेची पर्स परत करून प्रामाणिकपणा दाखविला आहे.

नवीन पनवेल रेल्वे स्टेशनजवळील अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाच्या कट्ट्यावर रविवारी (दि. ३) रात्री ८ वाजता एक कुटुंब आले. सर्व कुटुंब घाबरलेले दिसत होते. त्यांची चौकशी अध्यक्ष प्रकाश विचारे आणि सचिव साहेबराव जाधव यांनी केली असता त्या महिलेची पर्स रिक्षात राहिली असून त्यात १० हजार आणि सोन्याची अंगठी होती. स्थानिक रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांजवळ संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू केले. त्याचवेळी रिक्षाचालकाच्या मुलीने संपर्क करून माझ्या वडिलांच्या रिक्षेत तुमची पर्स आहे. आम्ही तळोजाला घरी आहोत असे सांगितले.

यानंतर रवींद्र शिनगारे आणि त्यांची मुलगी रात्री अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाच्या कट्ट्यावर आली. त्या कुटुंबाला पर्स परत केली. त्याबद्दल त्या कुटुंबाने आभार मानले. अश्वत्थामा जेष्ठ नागरिक संघाच्या बाप लेकीचे खास कौतुक केले.



# नवे सरकार स्थापन झाल्याने अभिषेक



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राच्या राजकारणात नैसर्गिक बहुमताच्या बाजूने पारडे झुकले असून पुन्हा एकदा हिंदुत्वाची मशाल घेतलेले एकनाथ शिंदे मुख्यमंत्री म्हणून, तर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी पदभार स्वीकारला आहे. यानिमित्त कामोठे, कळंबोलीत अभिषेक करण्यात आला.

लवकरच मंत्रिमंडळ विस्तार करण्यात येणार असून आमदार गोपीचंद पडळकर व आमदार प्रशांत ठाकूर यांना मंत्रिपद मिळावे यासाठी कामोठे मायाक्का मंदिरात राजमाता अहिल्यादेवी संस्था आणि कामोठे, कळंबोली येथील समस्त बहुजन समाजाच्या वतीने अभिषेक करण्यात आला.

**पनवेल : पावसाचा जोर दिवसेंदिवस वाढत आहे. त्या अनुषंगाने गुळसुंदे येथील भाजपचे युवा कार्यकर्ते योगेश साठे यांनी वृक्षारोपण मोहीम हाती घेतली आहे.**



## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. टाटा उद्योग समूहातील सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीचे नाव काय आहे?**

- ***अ.*** टाटा एलेक्सी
- ***आ.*** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)
- ***इ.*** टाटा टेलिसर्व्हिसेस लिमिटेड
- ***ई.*** टाटा सन्स लिमिटेड

**२. आपल्या देशातील सर्वाधिक बाजारमूल्य असलेली कंपनी कोणती?**

- ***अ.*** रिलायन्स इंडस्ट्रीज
- ***आ.*** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)
- ***इ.*** इन्फोसिस
- ***ई.*** एल अॅड टी

**३. शेअर बाजाराच्या सेन्सेक्स इंडेक्समध्येकिती कंपन्यांचा समावेश आहे?**

- ***अ.*** १००
- ***आ.*** ३०
- ***इ.*** ५०
- ***ई.*** १०

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**


## संपादकीय

# लोकशाही चिरायु होवो

'लोकांनी, लोकांच्या कल्याणासाठी चालवलेले राज्य म्हणजेच लोकशाही' अशी एका ओळीतील सुटसुटीत व्याख्या अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि द्रष्टे विचारवंत नेते अब्राहम लिंकन यांनी केली होती. त्याचे सुखद प्रत्यंतर सोमवारी विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात बघायला मिळाले.

**शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे आणि भारतीय जनता पक्षाचे चतुरस्त्र नेते देवेंद्र फडणवीस या दोघांनी अनुक्रमे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर महाराष्ट्रात सकारात्मक राजकीय वारे वाहू लागले आहेत. रविवारी विशेष अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी भाजप नेते अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांची बहुमताने विधानसभा अध्यक्षपदी निवड झाली आणि सोमवारी शिंदे-फडणवीस सरकारवरील विश्वासदर्शक ठराव १६४ विरुद्ध ९९ अशा प्रचंड मताधिक्याने पारित झाला. शिवसेना-भाजप युतीचे हे सरकार ऐतिहासिक सत्तानाट्यानंतर विराजमान झाले आहे. गेल्या दोन आठवड्यात महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड मोठ्या उलथापालथी झाल्या. होत्याचे नव्हते झाले. सत्तेवरून हकालपट्टी झालेल्या आणि अल्पमतात गेलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांची शिवराळ मुक्ताफळे सर्वत्र दुमदुमत होती. वातावरणामध्ये विखार भरून राहिला होता, परंतु त्या विखाराचा मागमूसदेखील विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात दिसला नाही. हेच खरे लोकशाहीचे सौंदर्य आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय चातुर्याची वाखाणणी करण्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतेदेखील मागे राहिले नाहीत. किंबहुना, काँग्रेसच्या बाळासाहेब थोरात यांनी फडणवीस सरकारने कार्यक्षमतेने कारभार केल्याची पोचपावती देखील आपल्या भाषणात दिली. उभयपक्षी कुठलाही कडवट भाव न दिसता खेळीमेळीच्या वातावरणात विधिमंडळाचे अधिवेशन पार पडले. वास्तविक ज्या परिस्थितीत हे सरकार जन्माला आले आहे, ती पाहता सभागृहामध्ये संघर्षाच्या ठिणग्या उडतील असा सर्वांचा अंदाज असणार, परंतु तसे न घडता नव्या सरकारचे मुक्त कंठाने स्वागत करण्याचा पवित्रा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी घेतला हे चांगलेच झाले. अर्थात काही शाब्दिक ठिणग्या उडाल्या आणि शालजोडीतील टोमण्यांची देवाणघेवाणही झाली. दोन दिवसांच्या या अधिवेशनामध्ये नव्या अध्यक्षांची निवडणूक, विश्वासदर्शक ठरावावरील मतदान आणि विरोधी पक्षनेतेपदाची निवड अशी तीन महत्त्वाची कामे पार पडली. उभयपक्षी अभिनंदनाचे ठराव पारित होताना परस्परांबद्दल चांगले उद्गार काढून सभागृहाच्या प्रथापरंपरांचा सन्मान राखला गेला, हे योग्यच झाले. विश्वासदर्शक ठरावाला उत्तर देताना नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जी जोरदार बॅटिंग केली, त्याला तोड नाही. त्यांच्यापाशी अमोघ असे वक्तृत्व नाही किंवा उपमा, अलंकार, शेरोशायरी यांचा शाब्दिक फलोराही नाही. एका सामान्य कार्यकर्त्याने सर्वोच्च स्थानावर पोचल्यावरही आपला साधेपणा बिल्कुल न सोडता सामान्यांच्या भाषेतच संवाद साधला, तो अतिशय लोभस होता. अपघातात गमावलेल्या आपल्या दिवंगत अपत्यांचा उल्लेख करताना ते भावूक झाले. आपल्यावर झालेल्या अन्यायाबद्दल बेधडक बोलताना ते परखडदेखील झाले आणि सभागृहातील मित्र सदस्यांबद्दल बोलताना त्यांनी हशा पिकवला. आम्ही गद्दार नाही, उलटपक्षी अडीच वर्षांपूर्वी केलेली चूक सुधारून भाजपसोबत सरकार स्थापन करून जनादेशाचाच आदर करीत आहोत हे त्यांनी सभागृहाला पटवून दिले. विरोधी पक्षनेतेपदी अजित पवार यांची निवड झाल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मुख्यमंत्री शिंदे यांनीही मुक्त कंठाने स्तुती करीत पवार यांचे अभिनंदन केले. एकंदरीत अधिवेशनाचे दोन्ही दिवस हा लोकशाहीचाच सोहळा होता. महाराष्ट्रात पुन्हा खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्तापित झाली आहे.**

# महाराष्ट्रातील किल्ले संवर्धन काळाची गरज!



महाराष्ट्रातील पर्यटनाचा गांभीर्याने विचार करावयाचा असेल तर लेणी आणि मंदिरे यांच्यासोबत येथील किल्ले प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागतील. जगात वैविध्यपूर्ण आणि वेगवेगळ्या काळात उभारलेले किल्ले फक्त महाराष्ट्रातच आढळतात. जीवनाच्या आरंभापासून स्वसंरक्षणासाठी मानवाने निवडलेल्या अनेक पर्यायांमधून किल्ल्यांचा जन्म झाला.

पाषाण युगात शिकार करून अन्न मिळविताना बांबू/काठ्या आणि नंतर दगड मातीचा वापर करून निवाऱ्याची सोय केली. नवाष्म युगात भटके जीवन सोडून आपण सामुदायिकपणे शेती करू लागलो. तेव्हा नगरे आणि शहरे यांची संकल्पना निर्माण झाली. या काळात शहरांभोवती भिंती उभारणे म्हणजेच एका प्रकारे किल्ल्यांची प्राथमिक अवस्था आकारास आली. हडप्पाकाळापासून ताम्रपाषाण, प्रागैतिहासिक, ऐतिहासिक आणि नंतर मध्ययुगीन काळापर्यंत किल्ले निर्मितीचे शास्त्र व कौशल्य विकसित होत गेले. प्राचीन एतद्देशीय व परदेशी अनेक साहित्यात किल्ल्यांचा उल्लेख आढळून येतो. आपल्याकडील ऋग्वेद, मनुस्मृती, कौटिल्यीय अर्थशास्त्र, महाभारत (शांतिपर्व) आणि पुराणांमध्ये किल्ल्यांबद्दल विवेचन केले आहे. सोमेश्वरकृत अमिलाषितार्थचिंतामणी ग्रंथात जलदुर्ग(द्वीपदुर्ग),गिरीदुर्ग, अश्मदुर्ग, इष्टिकादुर्ग, मृत्तिकादुर्ग, नरदुर्ग, वनदुर्ग व मरुदुर्ग असे किल्ल्यांचे असे प्रकार विशद केलेले आहेत. परंतु ढोबळ मानाने स्थलदुर्ग (भुदुर्ग/ भुईकोट), गिरीदुर्ग आणि जलदुर्ग अशा तीन प्रकारांमध्ये किल्ल्यांचे वर्गीकरण करता येईल.

महाराष्ट्रात सर्व प्रकारातील आणि निरनिराळ्या काळातील वैशिष्ट्यपूर्ण किल्ले आहेत. गुप्त, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव यांच्या मुस्लिमपूर्व काळातील देवगिरी, साल्हेर-मुल्हेर, अंकाई-टंकाई, अंजनेरी, मार्कंडा, त्रिंबक, रांगणा, पावनगड, पन्हाळा, विशाळगड, आदि किल्ले पाहावयास मिळतात. त्यानंतर मुस्लिम, पोर्तुगीज आणि मराठा राजवटीत शिवनेरी, राजगड, रायगड, कुलाबा, जंजिरा, प्रतापगड, विशाळगड, अर्नाळा, सुवर्णदुर्ग, पुरंदर, वसई, शिरगाव, माहीम, वरळी, शीव, सेंट जॉर्ज, आदि किल्ले आजही गतवैभवाची साक्ष देतात.

महाराष्ट्र शासनाच्या नोंदीनुसार राज्यात एकूण ४३५ किल्ले आहेत. त्यापैकी ४७ किल्ले केंद्रीय पुरातत्व खात्याच्या अखत्यारीत तर ५१ किल्ले राज्य पुरातत्व विभागाकडे असे ९८ किल्ले वर्गीकृत केलेले आहेत. उर्वरित ३३७ किल्ले अवर्गीकृत असून ते राज्याच्या महसूल विभागाच्या कार्यकक्षेत येतात. या ३३७ किल्ल्यांपैकी काही वन क्षेत्रात आहेत तर काही खासगी मालमत्ता म्हणून व्यक्तिगत मालकीचे आहेत. वर्गीकृत किल्ल्यांपैकी १४ किल्ले जागतिक वारसास्थळ मान्यतेसाठी प्रस्तावित केले गेले आहेत.

किल्ले हा आपला ऐतिहासिक वारसा असल्याने जनमानसात श्रद्धास्थानी आहेत. किल्ल्यांचा इतिहास, भौगोलिक वैविध्य, नैसर्गिक वातावरण, साहसी मार्ग आणि पुरातत्वीय संशोधन या माध्यमातून विचार केल्यास, यातील अनेक किल्ल्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने नियोजन आणि विकास करून राज्याला महसूल मिळविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवे. यासाठी शासनाने अनेक योजना हाती घेतल्या आहेत. किल्ल्यांचा पर्यटनासाठी विकास करताना त्यांचे पावित्र्य आणि पुरातत्वीय महत्त्व कसोशीने अबाधित ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळेच या दोन महत्वाच्या बाबी लक्षात घेऊन विकास कामांचे आराखडे बनवावे लागतील. किल्ल्यांचा पर्यटनासाठी कायापालट करताना त्यांचे ऐतिहासिक आणि मूळ प्राचीन अवशेष पुरातत्वीय संकेतानुसार जपावे लागतील. राज्यात जरी ४३५ किल्ले अस्तित्वात असले तरी त्यातील सर्वच किल्ल्यांच्या पर्यटनासाठी उपयोग होणे शक्य नाही. परंतु प्रसिद्ध ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार किल्ले, नैसर्गिक साधनसंपत्तीने युक्त किल्ले तसेच पॅराग्लायडिंग, आकाशदर्शन, यासारखे आकर्षण व पर्यटनमूल्य असलेले ५० किल्ले निवडून त्यांचा सर्वांगीण अभ्यास करून योजना आखल्यास देशी तसेच विदेशी पर्यटक इकडे वळतील यात शंका नाही. महाराष्ट्राचा मध्ययुगीन इतिहास छत्रपती शिवाजी महाराजांमुळे जगभर प्रसिद्ध आहे. त्यामुळे त्यांच्या काळातील किल्ल्यांवर घडलेल्या घटना, युद्ध आदिंची माहिती दृकश्राव्य लेझर शो सारख्या उपक्रमाद्वारे सादर केल्यास उत्तम प्रतिसाद मिळेल. किल्ल्यांवरील बुरुज, दरवाजे, तटबंदी, माची, खंदक, पाण्याची टाकी, तलाव, मेट, चिलखत (बुरुजांमागील संरक्षक भिंत / फळी), मनोरे, भुयारे, गढी, खलबतखाना, कोठारे, अंबारखाना, हत्तीशाळा, पागा यांची उपयुक्तता आणि रचना पर्यटकांना प्रशिक्षित गाईडच्या माध्यमातून सांगितल्यास ते पर्यटनास पूरक ठरेल. महाराष्ट्राच्या सह्याद्रीतील किल्ले ट्रेकिंग आणि हायकिंग सारख्या साहसी पर्यटनासाठी पोषक आहेत. सह्याद्रीतील निसर्ग, वनस्पती यांची ओळख पर्यटकांना देता येईल. हे करताना किल्ल्यांच्या घेऱ्यातील स्थानिक ग्रामस्थांना रोजगाराच्या नव्या संधी आपोआप निर्माण होतील. किल्ल्यांवर असणारी मंदिरे धार्मिक पर्यटनाला चालना देतील. किल्ल्यांमुळे स्थापत्य अभियांत्रिकी आणि वास्तु अभ्यासकांना शैक्षणिक पर्यटनासाठी मदत होईल.

एकंदरीत महाराष्ट्रातील किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने मिळालेला वरदान आहे. या किल्ल्यांच्या पाठीशी येथील प्राचीन राजसत्तांचा प्रभावी आणि गौरवशाली इतिहास आहे. पर्यटनाचा मूळ हेतू रोजच्या दैनंदिन जीवनातुन वेळ काढून विरंगुळ्याच्या मानसिकतेने वेगळ्या वातावरणात रममाण होणे हाच असतो. नेमके हेच किल्ल्यांच्या पर्यटनाच्या रूपाने प्रभावीपणे होऊ शकते. आपल्या पूर्वजांच्या इतिहासकालीन पराक्रमाची अन् वैभवाची प्रचिती देणाऱ्या किल्ल्यांकडे आपण आत्मीयतेने वळतो. तिथे जाऊन प्राचीन वारशाची अनुभूती घेतो. म्हणूनच किल्ल्यांकडे पर्यटनाच्या दृष्टीने बघणे ही काळाची गरज आहे. सन १८१८ नंतर आपले किल्ले अज्ञातवासात गेले. तिथल्या वाटा ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक उद्ध्वस्त केल्या. त्यामुळे शे-सव्वाशे वर्षे किल्ल्यांच्या वास्तूंची निगा राखली गेली नाही. इतका प्रदीर्घ काळ हे किल्ले आपण निसर्गाच्या स्वाधीन केले होते. साहजिकच देखभाल-दुरुस्ती आणि वहीवाटी अभावी त्यांचे अपरिमित नुकसान झाले आहे. तटबंद्या ढासळल्या आहेत. किल्ल्यावरील घरे, कोठारे, वाडे कोसळले आहेत. पाण्याची टाकी, तळी गाळाने भरली आहेत. त्यामुळे आज तेथील पर्यटन वाढवायचे असल्यास आपल्याला खूप पूर्वतयारी करावी लागणार आहे. यासाठी पुढाकार आवश्यक आहेच पण त्याचबरोबर स्थानिक नागरिकांनीसुद्धा जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत.

आज दळणवळणाच्या सुविधा वाढलेल्या असल्याने किल्ल्यांवरील वर्दळ वाढली आहे. किल्ल्यांवर जाणारे पर्यटक तिथल्या वास्तूंची काळजी घेत नाहीत, पर्यावरणाचे नुकसान करतात, प्लास्टिकचा कचरा वाढला आहे. मौज मजेसाठी मद्यपान केले जाते. या सर्वांमुळे किल्ल्यांचे नुकसान होत आहे. स्थानिकांनी जागरूकता दाखवून अशा अपप्रकारांना स्वयंस्फूर्तीने आळा घालायला हवा. ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन येणाऱ्या पर्यटकांना शिस्त लावायला हवी.

शासनस्तरावर आत्तापर्यंत विविध योजना जाहीर झाल्या पण त्यांना यशस्वी व्यावसायिक स्वरूप येऊ शकले नाही. शासनाकडील निधीच्या त्रुटीमुळे बऱ्याचदा या योजना खासगी सहभागातून प्रस्तावित झाल्या. पण पुरातत्व विभागाचे नियम, अटी शर्ती यामुळे अपेक्षीत तसा प्रतिसाद मिळाला नाही. किल्ल्यांच्या पर्यटनासह तिथे लग्न सभारंभ, प्री वेडिंग छायाचित्रण, सभा संमेलने, इत्यादी किंवा तत्सम कार्यक्रमांमार्फत निधी उभारून स्वयंपूर्ण व शाश्वत योजनाही प्रस्तावित केल्या गेल्या. परंतु त्यातील आर्थिक व्यवहार्यता परिपूर्ण नसल्याने त्या कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत. केंद्रीय पुरातत्व विभाग, राज्य पुरातत्व विभाग, पर्यटन, सांस्कृतिक आणि वन विभागाच्या परस्पर समन्वयाच्या अभावामुळे योजनांमध्ये अनेक तांत्रिक अडचणी उद्‌भवल्या. शिव छत्रपतींच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याच्या विकासासाठी २०१७मध्ये रायगड विकास प्राधिकरणाची स्थापना झालेली आहे. आतापर्यंत या प्राधिकरणातर्फे अनेक कामे सुरु झाली आहेत.

**-प्रवीण सहदेव कदम**




## तुमचे व्हॉटस्‌अ‍ॅप अकाउंट 'या'मुळे होऊ शकते ब्लॉक

जर तुम्ही व्हॉट्सअ‍ॅपवर चुकीची भाषा वापरत असाल तर तुमचे व्हॉट्सअ‍ॅप अकाउंटदेखील ब्लॉक होऊ शकते. हल्ली बऱ्याच जणांचे व्हॉट्सअ‍ॅप अकाउंट ब्लॉक झालेत. व्हॉट्सअ‍ॅप प्रत्येक वेळी एक नवीन आयटी नियम जारी करते. यावेळी



व्हॉट्सअ‍ॅपने एक अहवाल जारी केला आहे, जो २०२१ आयटी नियम अंतर्गत आहे. या अहवालांतर्गत, अयोग्य भाषा आणि अनैतिक मजकुरामुळे त्या महिन्यात किती व्हॉट्सअ‍ॅप अकाउंटवर बंदी घालण्यात आली याची माहिती दिली आहे. त्याचवेळी, मेटा कंपनी व्हॉट्सअ‍ॅपने जारी केलेल्या शेवटच्या अहवालानुसार, कंपनीने मे २०२२मध्ये भारतात सुमारे १.९ दशलक्ष म्हणजेच एक कोटी ९० लाख व्हॉट्सअ‍ॅप खाती बंद केली आहेत. ही संख्या खूप मोठी आहे.

या नवीन अहवालाबाबत, व्हॉट्सअ‍ॅपने सांगितले आहे की, आमचे ऑपरेशन खात्यांचा गैरवापर टाळण्यासाठी तीन टप्प्यांत काम करते. प्रथम नोंदणीवर, दुसरा संदेशादरम्यान आणि तिसरा नकारात्मक अभिप्राय म्हणजे निगेटीव्ह फीडबॅक दरम्यान होय. यानंतर खाती वापरकर्त्यांद्वारे रिपोर्ट आणि ब्लॉक प्रतिसाद असतात. ज्यामुळे अकाउंट ब्लॉक करण्यात येतात. व्हॉट्सअ‍ॅपची स्वतःची टीम आहे, जी या तीन चरणांमध्ये मेसेजचे निरीक्षण करते आणि ते अधिक चांगले आणि प्रभावी बनविण्यात मदत करते.

ज्यांच्या खात्यांवर बंदी घातली गेली आहे, त्यांना त्यांचे खाते सक्रिय करण्यासाठी अपील करण्याचा अधिकार असला तरी, व्हॉट्सअ‍ॅप क्वचितच त्याच्या निर्णयाविरोधात खाते सक्रिय करते. नवीन अहवालानुसार, मे महिन्यात एकूण ३०३ खात्यांनी यासाठी अपील केले होते, परंतु त्यापैकी केवळ २३ खाती पुन्हा सक्रिय झाली. याबद्दल, व्हॉट्सअ‍ॅप प्रवक्त्याने सांगितले की, आम्ही आमचे प्लॅटफॉर्म सुरक्षित ठेवण्यासाठी आणि वापरकर्त्यांना चांगली सेवा देण्यासाठी काही इतर अत्याधुनिक तंत्रज्ञान, डेटा वैज्ञानिक, तज्ज्ञ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसह नवीन प्रक्रियांमध्ये सातत्याने गुंतवणूक केली आहे. तर नवीन अहवाल भारतीय आयटी कायदा २०२१नुसार तयार केले गेले आहेत आणि आम्ही मे महिन्यासाठी आमचा अहवाल प्रकाशित केला आहे. व्हॉट्सअ‍ॅपच्या कारवाईच्या आधारे वापरकर्त्यांच्या तक्रारींवर आधारित हा वापरकर्ता सुरक्षा अहवाल आहे. व्हॉट्सअ‍ॅपद्वारे स्वतःच्या तपासणी कारवाईचाही समावेश आहे.

# प्रसिद्ध रहस्यकथा लेखक बाबुराव अर्नाळकर

चंद्रकांत सखाराम चव्हाण हे बाबुराव अर्नाळकर या टोपणनावाने लिहिणारे मराठी लेखक होते. त्यांचा जन्म ९ जून १९०६ रोजी झाला. मॅट्रिकच्या वर्गात असताना शाळा सोडलेले बाबूराव मराठीतील आघाडीचे रहस्यकथा लेखक होते. त्यांनी एकूण १०४२ रहस्यकथा लिहिल्या. खऱ्या अर्थाने त्यांनी तळागाळातल्या माणसांना मराठी वाचनाची गोडी लावली. चार आणे मालांपासून त्यांनी सुरुवात केली. त्यांचे नायक झुंजार, धनंजय-छोटू, मेजर सुदर्शन, इन्स्पेक्टर दिलीप, दर्यासारंग हे मराठी घरांघरांतून फिरले. ज्या काळात साने गुरुजी आणि वि.स. खांडेकर यांचे आणि ऐतिहासिक चरित्रांचे वाचन हेच शालेय विद्यार्थ्यांसाठी योग्य समजले जात होते, त्या काळात मुखपृष्ठावर पाठीत सुरा खुपसलेला मृतदेह आणि किंचाळणारी स्त्री असली चित्रे असलेली बाबूरावांची पुस्तके चोरूनच वाचली जात. त्यांचा मृत्यू ५ जुलै १९९६ रोजी झाला.

१९४२च्या चळवळीत तुरुंगात असताना 'सामान्य माणसासाठी लिही' असे बाबूरावांना सांगण्यात आले. सामान्य माणसाकरिता लिहायचे म्हणजे काय हे बाबूरावांना पडलेले कोडे होते. बाबूरावांना नाटकाची आवड होती. एका नाट्यक्लबाचे ते सभासद होते. त्या नाट्यक्लबातून ते एकदा विजयदुर्ग किल्ल्यात गेले. आणि



परत आल्यावर त्यांनी 'सतीची समाधी' नावाची गोष्ट लिहिली; ती अस्नोडकरांच्या 'करमणूक'मधून प्रसिद्ध झाली. त्याच दिवशी बाबूरावांना नाटककार अच्युत बळवंत कोल्हटकर भेटले. छान गोष्ट आहे, ते म्हणाले. एका मोठ्या माणसाला तुझी गोष्ट खूप आवडली आहे असे म्हणून ते बाबूरावांना नाथ माधव यांच्याकडे घेऊन गेले. नाथ माधवांनी अशाच रहस्यकथा लिही असे सुचवले. बाबूरावांनी मग लेखणी हाती घेतली, ती अखेरच्या श्वासापर्यंत खाली ठेवली नाही.

येरवड्याच्या तुरुंगात असताना विसापूरच्या तुरुंगातील काही राजकीय कैद्यांनी लढा देऊन सर्वच तुरुंगांतील राजकीय कैद्यांना वाचनासाठी पुस्तके पाठवावयास शासनाला भाग पाडले. अशा काही पुस्तकांतून एडगर वॅलेस यांची 'थ्री जस्ट मेन' ही कथा बाबूराव अर्नाळकर यांच्या हाती पडली आणि सामान्यांसाठी काय लिहायचे ते समजले. बाबूरावांचे स्नेही प्रभू हे रहस्यमाला काढीत असत. १९४२ च्या फेब्रुवारीत बाबूरावांनी लिहिलेली 'चौकटची राणी' ही पहिली रहस्यकथा पुस्तकरूपाने प्रकाशित झाली आणि बाबूरावांना ४० रुपये मानधन मिळाले. याच सुमारास चिंदरकर यांनी एक माला काढली होती त्या मालेत क्रमाने सात कथा लिहिल्यानंतर बाबूराव परत प्रभूंसाठी कथा लिहू लागले. बाबूरावांच्या कथांना पाश्चात्त्य कथांचा आधार असायचा, पण त्या कथांना मराठीत लिहिताना महाराष्ट्रीय वातावरणाचा साज असायचा. कथेत कुठेही अश्लीलपण येऊ न देण्याची खबरदारी बाबूराव घेत आणि कथेचा शेवट नेहमी 'सत्यमेव जयते' असाच असे. कथेतील प्रसंग वेगळे असले तरी नायक एकच ठेवायचा हे बाबूरावांनी निश्चित केले होते. नायकाचे नाव बाबूरावांना गीता वाचताना सुचले आणि त्यांनी धनंजय हे नाव मुक्रर केले. बाबूरावांचा कथानायक रुबाबदार, सुस्वभावी, समयसूचक आणि धडाडीचा असलेल्या वाचकांना त्याच्या गुणविशेषांची, वागण्याची, बोलण्याचालण्याची चांगलीच ओळख असे. इ.स. १९३७ ते १९४२ च्या दरम्यान 'मराठ' नावाचे एक मासिक चालवले होते. पुढे पुढे रहस्यकथा वाचायची वाचकांची आवड कमी होऊ लागली पण बाबूरावांचे रहस्यकथा लिहिणे थांबले नाही.




**श्रीवर्धन : उशिरा का होईना पावसाचा जोर वाढला, मात्र मध्येच सूर्याचेही दर्शन होत आहे. दिवेआगर समुद्र किनाऱ्यावरील सूर्यास्ताचे हे नयनरम्य दृश्य.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

### थायरॉईड नियंत्रित करू इच्छिता? ट्राय करून बघा 'हे' पाच सुपरफूड

थायरॉईडचा आजार ही आजच्या जगात एक सामान्य समस्या आहे. आपल्या देशात दररोज हजारोच्या संख्येने थायरॉईडच्या पेशंटची अनेक प्रकरणे नोंदवली जातात. थायरॉईड आजारावरील विविध अभ्यासांच्या अंदाजानुसार,




भारतातील सुमारे ४२ दशलक्ष लोक थायरॉईड आजाराने ग्रस्त आहेत. महिलांना या आजाराचा सर्वाधिक धोका असतो. थायरॉईड ही संप्रेरक नियामक ग्रंथी आहे. यातील असंतुलनामुळे हार्मोन्समध्ये कमी-जास्त प्रमाणात सतत बदल होतात. थायरॉईडची सामान्य पातळी ही ०.४-४.० mIU/L दरम्यान असते. समजा जर ही पातळी २.० पेक्षा जास्त असेल तर त्याला हायपो-थायरॉईडीझम म्हणतात. जर पातळी २.० कमी असेल तर त्याला हायपर-थायरॉईडीझम म्हणतात.

आपल्याला थायरॉईड आहे हे सुरुवातीच्या टप्प्यावर ओळखल्यास या समस्येवर नियंत्रण मिळवता येते आणि त्यातून सुटकाही होऊ शकते. जर उशिरा कळले तर औषधी दीर्घकाळ घ्यावी लागते. आयुर्वेदिक डॉक्टर दीक्षा भावसारणा यांनी थायरॉईड आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांसाठी काही आहाराविषयी माहिती दिली आहे. हा आहार एखाद्या सुपरफूडसारखच काम करतो असे त्यांचे मत आहे.

थायरॉईड झाला हे नक्की कसे कळते-तुमचे वजन वाढणे, अंगावर सूज येणे, घसा कोरडा पडणे, सतत मूड बदलणे, केस गळणे, प्रचंड अशक्तपणा येणे, चिडचिड होणे, निद्रानाशेची समस्या निर्माण होणे आदि सर्व गोष्टी तुम्हाला इशारा देतात की तुम्हाला थायरॉईडची सुरुवात होत आहे. तुम्ही तुमचे थायरॉईड नियंत्रित करू इच्छिता? आजपासून हे ५ सुपरफूड खाणे सुरू करा, काही दिवसातच तुम्हाला परिणाम दिसून येईल. थायरॉईड हे तुमच्या हृदयाच्या गतीसह शरीराची कार्ये सामान्य ठेवण्याचे काम करते. त्याचवेळी, जेव्हा तुमच्या थायरॉईड ग्रंथीत असंतुलन निर्माण होते, तेव्हा आपोआप तुमच्या हृदयाची गती वाढते. थायरॉईड ग्रंथीने व्यवस्थित काम करण्यासाठी तुमच्या शरीरात लोह, मॅग्नेशियम, आयोडीन, जस्त, जीवनसत्त्वे बी, सी, डी आणि सेलेनियमची आवश्यकता असते. हे सर्व घटक तुम्ही संतुलित आहारातून मिळवू शकता. १) आवळा- आवळ्यामध्ये संत्र्यापेक्षा ८ पट जास्त व्हिटॅमिन सी आणि डाळिंबापेक्षा १७ पट जास्त व्हिटॅमिन सी असते. २) ब्राझील सुपारी-सेलेनियम हे एक सूक्ष्म अन्नद्रव्य आहे जे शरीरातील थायरॉईड संप्रेरकांच्या चयापचयासाठी आवश्यक आहे.

# रानबाजिरे धरणातील बॅकवॉटरचा साठा कमी करण्यासाठी रात्रंदिवस प्रयत्न



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहतीला पाणीपुरवठा करणाऱ्या पोलादपूर शहरानजिकच्या रानबाजिरे धरणातील बॅकवॉटरचा साठा कमी करण्यासाठी धरणाचे सहा सांडवे आणि सर्व्हिस गेट खुले करण्यात आले आहेत. त्यामुळे बॅकवॉटरचा साठा कमी करण्यासाठी मे २०२२ पासून सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये आता वेगाने वाढ झाली आहे.

रानबाजिरे या धरणाची लांबी ३२० मीटर्स असून सांडवा १२१.८४ मीटर्स आहे. धरणातील पाणीसाठा ६१.५० मीटर पातळीवर २९.९५ दशलक्ष घनमीटर तर ५५ मीटर पातळीवर १६.४९ दशलक्ष घनमीटर असतो. मृतसाठा ३.६ दशलक्ष घनमीटर असून ६१.५० पातळीवर वापरण्यायोग्य पाणीसाठा २६.३२ दशलक्ष घनमीटर आणि ५५ मीटर पातळीवर पूर्ण संचय पातळी ६१.५० मीटर आहे. सांडव्यांची पातळी ५५ मीटर आहे. भिंतींची पातळी ६४.७० मीटर आहे. धरणाची महत्तम उंची ३३.६१५ मीटर असून पाणलोटक्षेत्र १९७.२५७ चौ.कि.मी इतके आहे. या धरणामुळे २.७० चौ. कि.मी. बुडीत क्षेत्र झाले आहे. सांडव्यांची क्षमता ३२४८.१३४ घनमीटर प्रतिसेकंद एवढी आहे.

सध्या येथील पाण्याची पातळी ५१.५० मीटर एवढी असून ४३ आरएलपर्यंत पाण्याची पातळी खाली करण्याची परवानगी आहे. मात्र, यावर्षी धरणाच्या बॅकवॉटरची पातळी ४३ आरएलपेक्षाही कमी करण्याचा प्रयत्न सुरू असून शनिवारी सकाळपासून सर्व सांडव्यांसह सर्व्हिस गेटमधून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. गेल्या वर्षी झालेल्या ६१.५० मीटर पातळीवर २९.९५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठ्यापैकी २२ मिलीयन क्युसेक पाणीसाठा धरणाचे सहा सांडवे खुले केले असताना अस्तित्वात होता. या सहा सांडव्यासोबतच दोन सर्व्हिस गेटसदेखील उघडण्यात आल्याने साधारणपणे प्रतिसेकंद २५९४६ घनमीटर पाणीसाठयाचा विसर्ग होत आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रानबाजिरे येथील धरणामध्ये गेल्या वर्षी २२ जुलै २०२१ रोजी चक्क ५७.६० मीटर एवढी पाण्याची पातळी वाढून धोक्याच्या ५८ मीटरच्या पातळीपर्यंत पोहोचण्याची वेळ आली होती. त्या अनुषंगाने मे महिन्यापासूनच बॅकवॉटरचा साठा कमी करण्यास सुरूवात करण्यात आली. आता संपूर्ण बॅकवॉटरचा जलाशय रिकामा करण्याच्या हेतूने सुरू झालेले प्रयत्न किमान चार दिवसरात्र सुरू राहिल्यास रानबाजिरे धरण सध्या सुरू असलेल्या पावसामुळे पुन्हा नव्याने भरण्यास सुरूवात होईल आणि पोलादपूर येथील सावित्री नदीपात्रातून महाडच्या दिशेने जाणारे पाणी कमी वेगाने जाईल, असा प्राथमिक अंदाज आहे.

# रास्तभाव धान्य दुकानदारांचे मुरूड तहसीलदारांना निवेदन




(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

वर्ल्ड फूड प्रोग्रॅम अंतर्गत रास्तभाव धान्य दुकानदारांना प्रति क्विंटल ४४० रुपये कमिशन देण्यात यावे किंवा दरमहा ५० हजार मानधन घोषित करावे, अशी मागणी मुरूड तालुका रास्तभाव धान्य दुकान संघटनेने तहसीलदारांना दिलेल्या निवेदन करण्यात आली आहे.

मुरूडचे नायब तहसीलदार गोविंद कौटुंबे यांनी हे निवेदन स्वीकारले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष गिरीश साळी, उपाध्यक्ष किशोर धामणस्कर, सचिव मंगेश कांबळे, अजित कासार, सचिन कासेकर यांच्यासह तालुक्यातील रास्तभाव धान्य दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. तहसीलदारांना निवेदन दिल्यानंतर या सर्व दुकानदारांनी संपूर्ण दिवस धरणे आंदोलन केले.

या वेळी या दुकानदारांनी सादर केलेल्या निवेदनातून मागणी केली आहे कि, गहू, तांदूळ व अंत्योदय कार्डधारकांना खाद्य पदार्थ वाटप करताना हँडलिंग लॉस भरून देण्याबाबतचा निर्णय त्वरित घेण्यात यावा, रास्तभाव धान्य दुकानदारांना एलपीजी गॅसचे वितरण द्यावे, तांदूळ, गव्हू ज्यूटच्या बारदानमध्ये भरून मिळावे, कोरोना काळात मृत्यू पावलेल्या रास्तभाव धान्य दुकानदारांना कोरोना योद्धा म्हणून जाहीर करावे, आदी मागण्याही तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.


## उरण नगरपरिषद उरण
### ता. उरण, जिल्हा रायगड, पिन कोड – ४००७०२
### जाहीर नोटीस

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप –२०२२/प्र.क्र.५/का.६, दि. १० जून २०२२ राज्यातील २०८ नगरपरिषदा व १३ नगरपंचायतीमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम २०२२ जाहीर करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, मुरुड जंजिरा, उरण, रोहा, महाड, माथेरान, खोपोली व श्रीवर्धन या नगरपरिषदांच्या प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या दि. ०५/०७/२०२२ पासून नगरपरिषदेच्या कार्यालयात तसेच नगरपरिषदेच्या व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत.

सदर प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या खालील लिंकवर दि. ०५/०७/२०२२ पासून पहावयास मिळतील.

| अ. क्र. | नगरपरिषदेचे नाव | प्रभाग निहाय प्रारुप मतदार याद्या पाहण्यासाठीची लिंक |
|---|---|---|
| १ | अलिबाग | http://drive.googel.com/drive/folders/1nLmm3cDGDeEI-nyR-PmcAKve_1DZgGMk?usp=sharing |
| २ | पेण | http://drive.googel.com/drive/folders/1uRcn6cMn3XOAT3HncX81wtUZMI1rdjd7?usp=shaing |
| ३ | मुरुड जंजिरा | http://drive.googel.com/drive/folders/1N_c6mACVyoKU9X_F5nuP2Bma6J3U3RR?usp=sharing |
| ४ | उरण | http://drive.googel.com/drive/folders/1fwNzaWnT3DRewyX1LOMCM1N3y6iA2uw2 |
| ५ | रोहा | http://drive.googel.com/drive/folders/1KCObmjFipM1DaGngfc-98RKeb4K5Krqy?usp=shaing |
| ६ | महाड | http://drive.googel.com/drive/folders/1-Pd6xIQgLXWZ_ZVRd1b_HNmKZuso-DMV?usp=shaing |
| ७ | माथेरान | http://drive.googel.com/drive/folders/1Uq_XYRYcH_ooTXE6OQrc-HMrFA_RRbPj?usp=shaing |
| ८ | खोपोली | http://drive.googel.com/drive/folders/16aoTtweUXCNnmttuZhiZtgOZuOCPwqbN?usp=shaing |
| ९ | श्रीवर्धन | http://drive.googel.com/drive/folders/1ifdlS81qICuJPaFvSLUaLU6tqLLj02PE |

स्थळ – रायगड
दिनांक. ३०/०६/२०२२
जा.क्र.: उनप/सा.प्र.वि./अंतिम मतदारयादी/१०९२/२०२२–२०२३

सही/–
**(डॉ. महेंद्र कल्याणकर)**
जिल्हाधिकारी, रायगड
अलिबाग


# जिल्ह्यात १३ ऑगस्टला राष्ट्रीय लोकअदालत

**अलिबाग : जिमाका**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार संपूर्ण रायगड जिल्ह्यात १३ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल अ. शिंदे यांनी कळविले आहे.

न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, १३८ एन. आय ॲक्ट खालील प्रकरणे, दिवाणी अपिले, नगरपालिका व ग्रामपंचायत यांच्या तडजोडपात्र घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे तसेच भारत दूरसंचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

१३ ऑगस्ट २०२२ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोकअदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष एस. एस. सावंत यांनी केले आहे.


## दि चिपळूण अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक लि., चिपळूण

स्थापना – १९३३ GSTIN : 27AACAT0333J1ZM
मुख्य कार्यालय : मेन रोड, बाजारपेठ, चिपळूण – ४१५६०५ जि. रत्नागिरी.
फो. नं. (०२३५५) २६१२७३, २६१०१८ फॅक्स २६११३५
Email : support@chiplunurbanbank.com, Website - www.chiplunurbanbank.com

### स्थावर मिळकत जाहीर लिलाव विक्री

(सिक्युरिटायजेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या अधीन राहून)

सिक्युरिटायजेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये प्राधिकृत अधिकारी, दि चिपळूण अर्बन को ऑप. बँक लि. चिपळूण, प्रधान कार्यालय, मेनरोड, बाजारपेठ चिपळूण, ता. चिपळूण, जिल्हा रत्नागिरी या बँकेच्या पनवेल शाखेतून श्री. पद्माकर बाबूलाल चव्हाण यांनी घेतलेले सुरक्षित कर्ज व त्यावरील व्याज, खर्च इत्यादी वसुलीसाठी ताब्यात घेतलेली खालीलप्रमाणे स्थावर मालमत्ता खालील स्वाक्षरीकर्ते **''जशी आहे आणि जेथे आहे''** या तत्वावर, खरेदीसाठी मोहोरबंद देकार मागवित आहोत. त्या मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| कर्जदार / जामीनदार / मिळकतदार नाव व पत्ता | मिळकतीचा तपशिल | राखीव किंमत रुपये | इसारा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| श्री. पद्माकर बाबूलाल चव्हाण व श्री. बाबूलाल हरी चव्हाण | मौजे – पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील मा. दुय्यम निबंधकसाहेब पनवेल आणि नगरपरिषद पनवेल यांचे कार्यक्षेत्रामधील फायनल प्लॉट नं. ५२१–२, पैकी सब प्लॉट्स नं. २७ व २८, क्षेत्र ६१९.५ अधिक ५९६.० मिळून १२१५.५ चौरस वार म्हणजे १०१६.६३ चौरस मिटर आहे. सदर प्लॉट्स हे मूळचे सर्व्हे नं. ४७१ पैकी आहेत. येणेप्रमाणे जमिन मिळकतीत ''किनारा को–ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.'' सी इमारतीमधील सदनिका क्र. सी–२/४, त्याचे क्षेत्र ३९६.३४ चौ. फुट पत्ता ५२ बंगलो ऐरिया, ता. पनवेल, जि. रायगड मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे :<br>पूर्वेस : लेआऊट प्लॅनमधील ३० फुटी रस्ता,<br>पश्चिमेस : सबप्लॉट नं. २९, ३०,<br>दक्षिणेस : टाऊन प्लनिंगमधील अस्तित्वात असलेला ४० फुटी रस्ता व<br>उत्तरेस : पनवेल को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीमधील अस्तित्वात असलेला रस्ता. | २५,०५,०००/– | २,५५,०००/– |

**अटी व शर्ती**

उपरोक्त मालमत्तावरील निर्देशित राखीव मुल्यापेक्षा कमी किंमतीत विकली जाणार नाही.
विक्रीच्या अटींची व शर्तीची पूर्तता न करणारे प्रस्ताव रद्द करण्यात येतील.

१. कर्जदार, जामीनदार, मिळकतदार व ताबेदार यांनी सदर लिलावाचे वेळी स्वत: उपस्थित रहावे, अनुउपस्थित राहिल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.
२. इच्छुक खरेदीदारांना मिळकतीची माहिती बँकेच्या कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वा. पर्यंत घेता येईल.
३. मिळकतीचा जाहीर लिलाव :–
लिलावाचे ठिकाण :– दि चिपळूण अर्बन को ऑप. बँक लि. चिपळूण
मुख्य कार्यालय चिपळूण, मेनरोड, बाजारपेठ चिपळूण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी.
लिलावाची तारीख :– २०/०७/२०२२
लिलावाची वेळ :– दुपारी ०१.३० वाजता.
४. मालमत्तेसंबंधी माहिती बँकेच्या पनवेल येथील शाखा कार्यालयात मिळेल. मो. नं. ९९६००५६९८६
५. देकारासोबत सदरची इसारा रक्कम रोख स्वरूपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत वा शेड्युल बँकेकडील शाखा चिपळूण येथे देय असलेला, दि चिपळूण अर्बन को ऑप. बँक लि. चिपळूण यांचे नावे असलेला बँक ड्राफ्ट / पे ऑर्डर स्वरूपात (अयशस्वी बोलीदारांना बिनव्याज परतावा देण्याची) असावी.
६. देकार उपरोक्त इसारा ठेवीसहचे (इरठे) मोहोरबंद लिफाफ्यातून त्यावर मालमत्ता श्री. बाबूलाल हरी चव्हाण यांच्या स्थावर मिळकत खरेदीसाठी देकार असे नामोलेख करून ते दि चिपळूण अर्बन को ऑप. बँक लि. चिपळूण मुख्य कार्यालय चिपळूण येथे ता. २०/०७/२०२२ रोजी दुपारी ०१.३० वाजता किंवा पूर्वी पोहच करावे.
७. ज्या खरेदीदाराने लिलावात सर्वात जास्त रकमेची बोली बँकेला देऊ केली असेल अशाच व्यक्तीला स्थावर मालमत्ता बँक विकेल.
८. यशस्वी बोलीदाराने सादर केलेली इरठेची रक्कम विक्री किंमतीत समयोजीत करण्यात येईल.
९. खालील स्वाक्षरीकर्त्यांकडे पोहोचलेले देकार विचार घेण्यात येतील आणि ते दि चिपळूण अर्बन को ऑप. बँक लि. चिपळूण मुख्य कार्यालय चिपळूण येथे ता. २०/०७/२०२२ दुपारी ०१.३० वा.पर्यंत देकार उघडणेत येतील. खुला लिलाव/आंतर बोलीही देकार उघडल्यानंतर होईल. देकारदार यावेळी उपस्थित राहून आपले देकार पुढे वाढवून/सुधारू शकतात. विक्री झाल्याच्या खात्रीनंतर यशस्वी देकारास २५ टक्के रक्कम त्वरीत भरावी लागेल, आणि उर्वरित रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्यांनी विक्री पक्की केलेपासून १५ दिवसांचे आत भरावी लागेल. अन्यथा कुठलीही पूर्वसूचना न देता, देकारदाराने आधी भरलेली संपूर्ण रक्कम बँक जप्त करेल व मालमत्तेची पुनःविक्री केली जाईल व कसूरदार खरेदीदारास कोणताही दावा करता येणार नाही. विक्री पक्की झाल्यापासून १५ दिवसानंतरच्या मुदतवाढीचा कालावधी तसेच अशा मुदतवाढीच्या अटी व नियम हे सर्वस्वी बँक / प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या मतानुसार राहतील वर दिलेल्या मालमत्तेवरील हस्तांतरण शुल्क, वीज, पाणी देयके, देखरेख शुल्क, सोसायटी हस्तांतरण खर्च, स्टॅम्प ड्युटी, वेधानिक देयता, कर इत्यादीसह कुठलीही वैधानिक देयता व इतर देय रक्कमांचा खर्च निश्चिती करावा लागेल. तो खर्च इच्छुक खरेदीदारास करावा लागेल. उच्चतम देकार किंवा अन्य एखादा किंवा सर्व देकार स्वीकारण्यास प्राधिकृत अधिकारी बांधील नसतील किंवा कोणतेही कारण न देता कुठलेही एक वा सर्व देकार स्वीकारणे किंवा नाकारण्याचे आपले अधिकार बँक/ प्राधिकृत अधिकारी राखून ठेवत आहेत. जर सर्व देकार नाकारण्यास प्राधिकृत अधिकारी मालमत्ता विक्रीसाठी एखादा निविदादार अथवा इतर पार्टीबरोबर खाजगी कराराबाबत चर्चा करू शकतो. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्ता/संपतीवरील कुणाही अधिकारीणीची कुठलीही देयके वा संरक्षीत मालमत्तेतील कुठलीही त्रुटी वगळणे/ फरक/ तफावत/कमी भरणे वा कसलीही परवानगी घेणे इ. कशाचीही जबाबदारी बँक/ प्राधिकृत अधिकाऱ्यांची राहणार नाही. प्राधिकृत अधिकारी त्यांच्या मतानुसार लिलावाच्या अटी बदलू / सुधारू/ फिरवू शकतात. यशस्वी खरेदीदारास विक्रीची संपूर्ण किंमत भरल्यानंतर आणि विक्रीच्या सर्व सोपस्कारांच्या पूर्ततेनंतर सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे विक्री प्रमाणपत्र देण्यात येईल. कोणतेही कारण न देता विक्री प्रमाणपत्र जारी करण्यापूर्वी कोणत्याही वेळी विक्री रद्द करण्याचे अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवत आहे. अशा प्रकरणी यशस्वी बोलीदाराने भरलेली सर्व रक्कम बिनाव्याज परत देण्यात येईल, विक्री करावयाच्या मालमत्तेतील जंगम मालमत्ताही विकीसाठी नसून तिची बँकेद्वारा विल्हेवाट लावून झाल्यानंतरच खरेदीदारास जमीन व इमारतीचा ताबा हस्तांतरीत करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.
१०. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या ज्ञात माहितीनुसार स्थित मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचे भार नाहीत.
११. वरीलप्रमाणे दिलेला प्रॉपर्टीचा तपशिल बरोबर आहे. परंतु संबंधीत तपशिलाबाबत खात्री करून घेण्याची जबाबदारी मालमत्ता खरेदीदाराची राहील. त्यास प्राधिकृत अधिकारी अथवा बँक जबाबदार असणार नाही.
१२. खरेदीदाराने आपले देकार दिलेल्या वेळेआधी व तारखेआधी सादर करावेत. त्यानंतर येणारे देकार स्वीकारले जाणार नाहीत.
१३. खरेदीदाराने फोटो प्रुफ, ॲड्रेसप्रुफ, पॅनकार्ड सोबत आणावे.
१४. यशस्वी खरेदीदाराची विक्रीची निश्चिती झाल्यापासून प्रॉपर्टीची जबाबदारी खरेदीदाराची राहील. त्यांस बँक/प्राधिकृत अधिकारी जबाबदार असणार नाही.

या जाहिरातीची इंग्रजी आवृत्ती इंग्रजी पेपर ''न्युज बॅण्ड'' ता. ५ जुलै २०२२ मध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे.
सिक्युरिटायजेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना.
कर्जदार/जामीनदार यांना सूचना देणेत येते की, वरील निर्देशित रक्कम व्याज, मुल्य, खर्च इत्यादीसह लिलाव तारखेपूर्वी प्रदानित करावी. अन्यथा सुरक्षित मालमत्तेचा लिलाव करण्यात येईल आणि उर्वरित रक्कम व्याज आणि मुल्यांसह, कायदेशीर मार्गाने वसूल करण्यात येईल.
**नोटीस :–** वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा पोटगीहक्क, भाडेहक्क, गहाणहक्क, साठेकराराचा हक्क, अगर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधीत इसमांनी या व्यवहारास आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह १५ दिवसांचे आत खाली सही करणार, प्राधिकृत अधिकारी यांचेकडे पाठवावी अथवा प्रत्यक्ष सादर करावी.

**ठिकाण : चिपळूण**
**दिनांक : ३०/०६/२०२२**
**दि चिपळूण अर्बन को ऑप. बँक लि. चिपळूण**

शिक्का

सही/–
**(श्री. दिनेश अरविंद रेडीज)**
**प्राधिकृत अधिकारी**



## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
## ता. पनवेल, जि. रायगड
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**मे व जून २०२२**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | मालमत्ता वर्णन | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रताप नारायण आगवणे | शकुंतला नारायण आगवणे | सदनिका क्र. १०३, महिला मजला, बि.नं.बी १, विठोबा कॉम्प्लेक्स को.हौ.सो. मौजे पालीदेवद | पवल ३–२७१३–२०२२ | १७/०२/२०२२ |
| २ | प्रमोद मनोहर भामरे ज्योती प्रमोद भामरे | गिरीश अरुण सुर्वे | सदनिका क्र. २२, दुसरा मजला, बि.नं.बी १०, स्नेहसागर को.हौ.सो. युगांतर हौसिंग कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद | पवल१–२०७–२०२२ | ०७/०१/२०२२ |
| ३ | विजय गणपत मेस्त्री श्रद्धा विजय मेस्त्री | रवि प्रकाश, श्याम नारायण सिंह कुशवाह | सदनिका क्र. ३०१, तिसरा मजला, डी विंग, निंबेश्वर पार्वती, मौजे पाली देवद | पवल५–७२ २६–२०२२ | २९/०४/२०२२ |
| ४ | दिलदार मो. जमील | धनंजय महादू केणी | सदनिका क्र. ३०७, तिसरा मजला, माऊली आशिर्वाद, मौजे पालीदेवद | पवल१–३३ १३–२०२० | ०२/०७/२०२० |
| ५ | पी. के. अजेशकुमार, श्रीजा अजेशकुमार | प्रविणकुमार गोविंदराव देशपांडे | सदनिका क्र. सी १२, पहिला मजला, श्री सावननगरी को.हौ.सो.लि., मौजे पालीदेवद | पवल१–५६ ५१–२०२२ | ०६/०५/२०२२ |
| ६ | गणेश नारायण चिटके, पल्लवी गणेश चिटके | मनोज नामदेव कोळी | सदनिका क्र. १२, शिवकृपा को. हौ.सो.लि. मौजे शिलोत्तर रायचूर | पवल३–६६ ८८–२०२२ | १२/०४/२०२२ |
| ७ | राजेश स्वरुपराम चौधरी | राणी मोहिंदर कपूर | सदनिका क्र. बी.०३, तळ मजला, शिवम श्री सावननगरी को.हौ.सौ. लि., मौजे पालीदेवद | पवल३–२० ७७६–२०२१ | ३०/१२/२०२१ |
| ८ | प्रितम एकनाथ मगर, छाया एकनाथ मगर | गोरक्षनाथ रघुनाथ गायकवाड सपना गोरक्षनाथ गायकवाड | सदनिका क्र. १०४, महिला मजला, बि.नं.४, साक्षी पार्क २, को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर | पवल४–३१ ४६–२०२२ | १४/०३/२०२२ |
| ९ | देविंद्र हनमंत मदर, राजश्री देविंद्र मदर | मे. संतोषी माता डेव्हलपर्स | सदनिका क्र. ३०६, तिसरा मजला, वैष्णवी आशिर्वाद, मौजे शिलोत्तर रायचूर | पवल१–४१ ६१–२०१९ | २३/०४/२०१९ |
| १० | भारती संतोष उरणकर | लक्ष्मीबाई जानू पाटील | सदनिका क्र. ३०४, तिसरा मजला, जनलक्ष्मी बिल्डींग, मौजे शिलोत्तर रायचूर | पवल३–६४ ०८–२०१७ | ११/१०/२०१७ |
| ११ | ब्रीजीता सदाशिवन | जी. सदाशिवन | सदनिका क्र. २, तळ मजला, बि.नं.बी. ३, अविष्कार को.हौ.सो. लि. मौजे पालीदेवद | पवल५–४६ ६८–२०२० | ११/०८/२०२० |
| १२ | बिमल त्रिपाठी, बिरेंद्र नाथ त्रिपाठी | धनलक्ष्मी नटराजन तर्फे अखित्यारी सेलवन रंगास्वामी नायडू | सदनिका क्र. बी ३०१,तिसरा मजला, पुष्पदीप को.हौ.सौ.लि. मौजे शिलोत्तर रायचूर | पवल१–४२ ५५–२०१८ | १९/०४/२०१८ |
| १३ | मंगल सुधाकर ताडगे | इद्रिस नम्रान कागलवाला, सफिया इद्रिस कागलवाला | सदनिका क्र. ३००५, ३० वा मजला, जरना को.हौ.सो. लि. बालाजी सिम्फोनी मौजे शिलोत्तर | पवल५–८७ ८३–२०२२ | २५/०५/२०२२ |
| १४ | मनोज फिलीप | जोजु एम. जोस | सदनिका क्र. १३, महिला मजला, श्री सावननगरी को.हौ.सो.लि. मौजे पालीदेवद | पवल१–८९ ९८–२०१८ | ०६/०९/२०१८ |
| १५ | रसिका समीर म्हात्रे | संदीप नंदकुमार मूर्ती, गणेश चंद्रकांत गिरधर, अंजली गणेश गिरधर (मुळ मालक) | सदनिका क्र. १०३, पहिला मजला, एफ विंग, प्रयाग आंगण को.हौ.सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर | पवल२–८३ १६–२०२२ | १०/०६/२०२२ |
| १६ | मिथुन कुमार, अर्चना कुमारी | प्रकाश जगन्नाथ म्हसकर | सदनिका क्र. ००३, तळ मजला, आराधना अपार्टमेंट, मौजे पालीदेवद | पवल२–७१ ८३–२०२२ | १७/०५/२०२२ |
| १७ | शांती मोहन | मन्नूराम सुधुराम साहू | सदनिका क्र. सी २०३, दुसरा मजला, साक्षी पार्क२, बि.नं.३ को.हौ.सो. मौजे | पवल१–५२ ४७–२०२१ | ११/०६/२०२१ |
| १८ | मनोहर विष्णू घाडीगावकर, साईनाथ विष्णू घाडीगावकर | रघुवीर गुर्जर | सदनिका क्र. २०१, दुसरा मजला, माऊली छाया फेज२, मौजे शिलोत्तर रायचूर | पवल२–८३ ६७–२०२२ | १३/०६/२०२२ |
| १९ | रोहित बाबूराज नायर, राधा बाबूराज नायर | पी. ए. कुलकर्णी यांचे कायदेशीर वारस अंबिका अषिम चंद्रन मेनन, संतोष कृष्णमूर्ती नायर, आनंद कृष्णमूर्ती नायर | सदनिका क्र. ६, पहिला मजला, बि.नं. ई ४, शांतीनिकेतन को.हौ. सो. युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद | पवल१–६७ १०–२०२२ | ०३/०६/२०२२ |
| २० | प्रथमेश किशोर पाटील, किशोर शंकर पाटील, संगीता किशोर पाटील | विनोद कुमार मदारा | सदनिका क्र. ४०३, चौथा मजला, जे विंग, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर | पवल५–४९ ८७–२०२२ | २४/०३/२०२२ |
| २१ | निलीमा निलेश नाक्ती, | मे.स्वामी समर्थ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | सदनिका क्र. ३०५, तिसरा मजला, शुभारंभ, मौजे पालीदेवद | पवल४–३८ ३५–२०२२ | २५/०३/२०२२ |
| २२ | गजानन दगडू नगरकर, शर्मिला गजानन नगरकर, करण गजानन नगरकर | मे.स्वामी समर्थ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | सदनिका क्र. ००४, तळ मजला, शुभारंभ, मौजे पालीदेवद | पवल४–५४ २६–२०२२ | २७/०४/२०२२ |
| २३ | श्यामा देवी अरुणकुमार , | शकुंतला आर. जयस्वाल, रामभवन पी. जयस्वाल | सदनिका क्र.ए २०१, दुसरा मजला, ए विंग, बि.नं.३, कार्तिक्य पार्क को. हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर | पवल३–१० २८५–२०२१ | ०१/०७/२०२१ |
| २४ | आरती बापू खडतरे, मनिषा बापू खडतरे | मे.स्वामी समर्थ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | सदनिका क्र. २०६, दुसरा मजला, शुभारंभ, मौजे पालीदेवद | पवल३–१३१ ६९–२०२१ | २०/०८/२०२१ |
| २५ | लक्ष्मण रामभाऊ गावडे | कार्तिक्य बिल्डर्स | शॉप क्र.१२, तळ मजला, कार्तिक्य गार्डन को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर | उरण–०२६ ६३–२००७ | ०३/०४/२००७ |
| २६ | आर्या जयदीप दासन | मे.नील बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | सदनिका क्र. १०३, पहिला मजला, नील अपार्टमेंट, मौजे पालीदेवद | पवल३–१३ ७४७–२०१८ | ०१/१२/२०१८ |
| २७ | जॉर्ज एस. गुंडी, फीलोमीना जॉर्ज गुंडी | मे.साक्षी रियलटर्स | सदनिका क्र.बी २०३, दुसरा मजला, बि.नं.०१, मौजे शिलोत्तर रायचूर | पवल१–०२ ३०८–२००७ | १७/०३/२००७ |
| २८ | ज्योती प्रकाश गायतोंडे, प्रकाश गविंदराव गायतोंडे, दीप्ती अभय प्रभू | सिलम आयुब खान, बसेफा सिलम खान | सदनिका क्र. २२०५, २२वा मजला, जे विंग, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर | पवल१–५२ ८८–२०२२ | २९/०४/२०२२ |
| २९ | प्रितम अरुण घवे, रीना प्रितम घवे | जगन्नाथ हरीभाऊ वरखडे | सदनिका क्र. १०७, ए विंग, पहिला मजला, ओमशक्ती कॉम्प्लेक्स ओंकार स्वरूप को.हौ.सो.मौजे पालीदेवद | पवल३–१३१ ६४–२०२१ | २०/०८/२०२१ |
| ३० | प्रणाली मधुकर रेडकर, | चंद्रकांत मारुती गुणगे, ज्योती चंद्रशेखर गुणके | सदनिका क्र. ए २०५, दुसरा मजला, पुष्पकलश २, को.हौ.सो.,मौजे शिलोत्तर रायचूर | पवल२–५६ २७–२०२२ | १२/०४/२०२२ |
| ३१ | कल्पना शिवाजी कांबळे, | सारिका आनंद गायकवाड, (दुसरे मालक) पी. गोविंदा कुट्टी (मुळ मालक) | सदनिका क्र. १२, दुसरा मजला, सरस्वती को.हौ.सो. मौजे पालीदेवद | मृत्यूपत्र व इच्छापत्र पवल –१–०२२ ९९–२००९ | २०/११/२०२१ १८/०४/२००९ |
| ३२ | रिना अजिंक्य गोसावी, अजिंक्य सुभाष गोसावी | राकेश भाकू | सदनिका क्र. २६०१,२६ वा मजला, जे विंग, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर | पवल५–६० ८२–२०२२ | ०८/०४/२०२२ |
| ३३ | सुनील दत्ताराम पाटील, श्वेता सुनील पाटील | उषा भगवान पाटील, उमेश भगवान पाटील, निलेश भगवान पाटील | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, ए विंग, नवनाथ कृपा को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर | पवल२–६० ०४–२०२२ | २०/०४/२०२२ |
| ३४ | विल्सन चाको फिलीप, शेर्ली विल्सन | एस. मैथिली शिवरमण, एस. गिरीजा | सदनिका क्र. ०२, तळ मजला, बि.नं. आर ३, श्रीनिवास को.हौ.सो. युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स,मौजे पालीदेवद | पवल४–९८ ३६–२०१३ | २१/१०/२०१३ |
| ३५ | महादेव बाळाराम शाबासकर | मे. माऊली, प्रसाद इंटरप्राइझेस तर्फे निकीता महेश पाटील | सदनिका क्र. १०२, पहिला मजला, दिव्या निवास, ग्रा.पं. मिळकत क्र. ४२४, मौजे पालीदेवद | पवल१–८२ २६–२०१८ | १३/०८/२०१८ |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/–**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल. जि. रायगड**

## निवडक

### शासकीय मालमत्तेचे नुकसान

**मोहोपाडा :** कराडे बुद्रुक येथील गट क्रमांक ४७/० क्षेत्रफळ सुमारे १२-८०-८३ यामध्ये बेकायदेशीररित्या प्रवेश करून ४,९८,६०० रुपये किमतीची ८३१ ब्रास माती उत्खनन करून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरी करून शासकीय मालमत्तेचे नुकसान केले आहे. त्यामुळे प्रभारी मंडळ अधिकारी मनोज बाळू मोरे (वय ५२) यांनी रसायनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. अज्ञात चोरट्याविरोधात भा. दं. वि. कलम ३२७, ४४७, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ व खाण आणि खनिज विकास व विनिमय अधिनियम १९५७ चे कलम २१ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक मंगेश सखाराम लांगी अधिक तपास करीत आहेत.

### कोकणात मध्यम पावसाची नोंद

**नवी मुंबई :** कोकण विभागात सोमवारी (दि. ४) सरासरी २५.१ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद सिंधुदुर्ग जिल्हयात ३२.६ मि.मी. झाली आहे. ठाणे १७.३मि.मी., पालघर २३.२मि.मी, रायगड ३०.६मि.मी., रत्नागिरी २०.१ मि.मी., सिंधुदुर्ग ३२.६ मि.मी. अशी जिल्हा निहाय पावसाची आकडेवारी आहे.

# खारघरमध्ये खड्ड्यांमुळे अपघात

## तत्काळ दुरुस्तीसंदर्भात पनवेल मनपाचे सिडकोला पत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर ४ मध्ये रस्त्यावर असलेल्या खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात निवृत्त मेजरला आपला जीव गमवावा लागला. शहरातील खड्डे धोकादायक ठरत असून तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी, असे पत्र पनवेल महापालिकेने सिडकोला दिले आहे.


(संग्रहीत छायाचित्र)

खारघर सेक्टर ४ मधील रस्त्यावर असलेल्या खड्ड्यामुळे रोनाल्ड गोम्स या सेवानिवृत्त मेजर बळी गेल्यामुळे नागरिकांचे संतापाचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, महापालिका आयुक्तांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत पालिकेच्या अधिकाऱ्यांना खारघर परिसरात असलेल्या अपघाताला खड्ड्यांचे तत्काळ सर्वेक्षण करून योग्य उपाययोजना करण्याची सूचना केली. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत खारघर परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे असून अनेक पदपथावरील मॅनहोलवरील झाकण गायब झाल्याचे निदर्शनास आले. रात्रीच्या वेळेस खड्डा लक्षात न आल्यास अपघात होण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा विचार करून सिडको आणि पालिका प्रशासनाने तत्काळ खारघरमधील अपघाती खड्डे दुरुस्त करावे, अशी मागणी केली जात आहे. याविषयी खारघरमधील सिडकोच्या कार्यालयात संपर्क केला असता, खड्डे दुरुस्तीचे काम सुरू असल्याचे सांगण्यात आले.

खड्ड्यामुळे रोनाल्ड गोम्स यांचा बळी गेल्यावर पनवेल महानगरपालिका प्रभाग ५ चे नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांनी तत्काळ दखल घेतली. त्यांनी सिडको अधिकाऱ्यांना दाखवून सेक्टर ३ व ४ मधील रस्त्यांवरील टेलिफोन केबल चेंबरची उंची वाढविण्याची सूचना सिडको अधिकाऱ्यांना देऊन वरील चेंबरचे काम करून घेतले. दरम्यान, या खड्ड्यामुळे आमच्या कुटुंबातील व्यक्तीचा बळी गेला. हा खड्डा दुरुस्ती करण्यात आल्यामुळे इतरांचे जीव वाचतील, अशी प्रतिक्रिया रोनाल्ड गोम्स यांच्या कुटुंबांनी दिली.

> **खारघर परिसरात असलेल्या अपघाती खड्ड्यांची पाहणी करून तत्काळ बुजवावे असे पत्र सिडको प्रशासनाला पाठविले आहे.**
>
> **-संजय जगताप, शहर अभियंता, पनवेल महापालिका**

# छत्री कारागीरांवर उपासमारीची वेळ

## नव्या खरेदीकडे नागरिकांचा कल

**उरण : वार्ताहर**

मुसळधार पाऊस सुरू झाला की, छत्री रेनकोट आदींच्या वस्तूंची खरेदी व दुरुस्ती हे दर वर्षाचे आहेच. दोन दिवस सतत मुसळधार पाऊस सर्वत्र सुरू असल्याने छत्री दुरुस्त कारागीर दुरुस्तीच्या कामात व्यस्त असल्याचे दिसत होते. असे असले तरी सद्या जुन्या छत्र्या दुरुस्त करण्यापेक्षा नवीन छत्री घेणाऱ्यांचा कल असल्याने छत्री कारागीरांवर उपासमारीची वेळ आली आहे.

उरणमध्ये राजपाल नाका, आनंद नगर, गांधी चौक, राजपाल नाका, मंगल जनरल स्टोअर समोर, गांधी चौक आदी ठिकाणी कारागीर मग्न झाले आहेत. उरण तालुका सह सर्वत्र मुसळधार पावसाने झोडपले. आठ महिने अडगळी ठिकाणी ठेवलेली छत्री पाऊस सुरू झाला की, आपल्यांना आठवण येते. ती शोधून वापरण्यासाठी सर्वांचीच धडपड असते. त्यातच ती नादुरुस्त मिळाली तर मग कारागीराकडे जा दुरुस्त करून घ्यावी लागते, अशी परिस्थिती सर्वत्र दिसत असते.



रेनकोटमुळे छत्री वापरणे कमी झाले आहे. छत्री दुरुस्त करण्याचे दर कमी असून तार बसविणे १० रुपये, मुठ बसविणे ३० रुपये असे दर असतांनाही सध्या आजकाल छत्री दुरुस्त करणे कमी झाले आहे. चायनाच्या स्वस्त छत्र्या बाजारात उपलब्ध झाल्याने युस ॲण्ड थ्रो झाल्याने छत्री दुरुस्तीचे काम कमी झाले आहे. वर्षातून एकदाच पैसे मिळतात, परंतु ते ही कमी झाले आहे त्यामुळे आम्हा कारागीरांवर उपासमारीची वेळ आली आहे, असे कारागीर राजा वाघरी यांनी सांगितले.

# नवी मुंबईत वैद्यकीय शिबिर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवलाईफ जेनेरिकस्च्या तुर्भे शाखा नवी मुंबई येथे शर्मिला एस. (इंजिनिअर. व्यवसाय विश्लेषक), पल्लवी पाटील (फार्मासिस्ट) यांनी १५ वर्षांचा अमेरिकेत वास्तव्यास असलेले तसेच कामाचा अनुभव असलेल्या डॉ. राहुल वडके यांच्या राहुलच्या क्लिनिक च्या सहकार्याने वैद्यकीय शिबिर आयोजित केले होते.



तुर्भे येथे लोकांना मदत करण्यासाठी वैद्यकीय शिबिर पूर्ण करून डॉक्टर डे आणि नवलाइफ जेनेरिकचा तुर्भे शाखेचा पहिला वर्धापन दिन साजरा करण्यात आला. नवलाइफ जेनेरिक्स आणि डॉ. राहुलचे क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल, करंजाडे आणि नाशिक नंतर हे चौथे वैद्यकीय शिबिर होते.

हे शिबिरही यशस्वी झाले असून १५० रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. उच्च रक्तदाब आणि मधुमेह असलेल्या २० नवीन रुग्णांचे निदान केले. बऱ्याच रुग्णांना बरे होण्यासाठी योग्य मार्गावर मार्गदर्शन करण्यात आले.

# रसायनीच्या पिल्लई कॉलेजमध्ये पोलिसांचे सायबर साक्षर अभियान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटनेचे महाराष्ट्र सचिव गणेश थोरवे व रायगड जिल्हा अध्यक्ष सागर काशिनाथ कुरंगळे आणि रसायनी पोलीस ठाण्याच्या वतीने पिल्लई कॉलेज रसायनी येथे सायबर साक्षर अभियान राबविण्यात आले.

रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर अधिक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी संजय शुक्ला, रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे व पोलीस उपनिरीक्षक धनाजी काळे यांच्या सहकार्यातून हे अभियान यशस्वी झाले.

या वेळी रसायनी सीईओ लता मेनन व वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे, उपनिरीक्षक धनाजी काळे, नाईक विशाल झावरे, मंगेश लांगी, भूपेश वेळे, जाधव मॅडम, पिल्लई स्टाफ आदी उपस्थित होते.



# रसायनीतील डॉ. पाटील हॉस्पिटलला पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कोरोना काळात आपल्या रुग्णालयाद्वारे अविरत व उत्कृष्ट सेवा देणाऱ्या हॉस्पिटलचा व पॅरामेडिक स्टाफचा सत्कार सोहळा रायगड मेडिकल असोसिएशन व इन मेजर सिटी फाउंडेशन नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ३) विष्णूदास भावे नाट्यगृह वाशी येथे आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यात डॉ. पाटील हॉस्पिटल रसायनीचे डायरेक्टर डॉ. जितेंद्र रामचंद्र पाटील व डॉ. अनघा जितेंद्र पाटील व त्यांच्या संपूर्ण हॉस्पिटल टीमला पदमश्री डॉ. हिम्मतराव बाविस्कर व खासदार संजीव नाईक यांच्या उपस्थितीत आरोग्यम धनसंपदा २०२२ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यासाठी रायगड मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. राजेश शिंदे, इन मेजर सिटी फाउंडेशनचे सुनील कुमार प्रभाकरन, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीचे प्रशासक डॉ.सोमनाथ गोसावी, नवी मुंबई होमिओपॅथिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रतिक तांबे तसेच निमा संघटनेचे अध्यक्ष व नवी मुंबई इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष तसेच रायगड जिल्ह्याच्या विविध भागातील अनेक नामांकित हॉस्पिटलचे डॉक्टर्स उपस्थित होते.



# हिंद मराठा महासंघाच्या कोकण विभागातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**पनवेल : वार्ताहर**

हिंद मराठा महासंघ राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले राष्ट्रीय अध्यक्ष उज्वलसिंह राजे गायकवाड, राष्ट्रीय सरचिटणीस ॲड. किशोर बांदल देशमुख, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुधीरराव पालांडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. आनंदराव भोसले, मुंबई प्रदेश अध्यक्ष संजय सावंत यांच्या सूचनेनुसार कोकण प्रदेशाध्यक्ष निवृत सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी कोकण प्रदेश नियुक्त्या जाहीर केल्या.



या वेळी बोलताना कोकण प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी सांगितले, मुंबई प्रदेश सरचिटणीसपदी निवृत्त एसीपी मंगेश सावंत, उत्तर मुंबई जिल्हा उपनगर अध्यक्षपदी निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त अनिल फोफले, पनवेल महापालिका क्षेत्र अध्यक्षपदी यतिन विनायक देशमुख, रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी अतुल चव्हाण, पनवेल शहर अध्यक्ष राजेंद्र जनार्दन भगत, उपाध्यक्ष अनिल दामोदर जाधव, जिल्हा सल्लागार पदी चिंतामणी भास्करराव धूरी यांच्या निवडीला राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले यांनी मान्यता दिली.

या वेळी गणेश बाबाजी परब कोकण प्रदेश सचिवपदी निवड जाहीर केली आहे. पनवेल येथील निवृत सहाय्यक पोलीस आयुक्त व हिंद मराठा महासंघ कोकण प्रदेश अध्यक्ष विनोद चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयात आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यात निवडीची घोषणा करण्यात आली. ॲड. इंद्रजीत भोसले प्रथमेश भोसले, रायगड जिल्हा सरचिटणीस प्रथमेश सावंत, राजेश परब आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले असुन पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा सदिच्छा व्यक्त केल्या आहेत.

# नवी मुंबई महापालिकेतर्फे लोकशाही दिनाचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

माहे ऑगस्ट महिन्याचा लोकशाही दिन महिन्याच्या पहिल्या सोमवारी ०१ ऑगस्ट २०२२ रोजी होणार असून निवेदनकर्त्यांनी आपला अर्ज विहित नमुन्यात दोन प्रतींमध्ये १८ जुलै २०२२ पर्यंत नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे अर्जाच्या वरील दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

अर्जात नमूद तक्रार अथवा निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जादाराने संबंधित विषयाबाबत याआधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपिल, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी. त्याचप्रमाणे विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत.

तक्रार अथवा निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे अथवा देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत. याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात आले आहे.

# आंतरशालेय स्पर्धांमध्ये विद्याभवनचे यश

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळाद्वारे आयोजित विविध स्पर्धांमध्ये पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील शिक्षण संकुलाने एकूण १७ पारितोषिके मिळवून उत्तम कामगिरी केल्याबद्दल संकुलास समाजसेविका ममता सिंधुताई सपकाळ, डॉ. अरुंधती भालेराव व माजी नगरसेविका नेत्रा शिर्के यांच्या हस्ते सन्मानचिन्हाने गौरविण्यात आले.

उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळ दशकपूर्ती सोहळा रविवारी (दि. ३) झाला. या समारंभात मंडळाकडून आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा आणि शाळांचा गौरव करण्यात आला. चित्रकला स्पर्धेत लहान गटातून नयना वाकटे, त्रिशा आडसुळे, मधुरा तरकसबंद आणि मोठ्या गटातून भूमी सावंत, गुंजन पार्टे, पायल सोनवणे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय पटकावला. निबंध स्पर्धेत लहान गटातून प्रणिती कळंत्रे, गार्गी कांबळे, मधुरा तरकसबंद आणि मोठ्या गटातून दमयंती आटपाडकर व अदिती केकान यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय पटकावला. वक्तृत्व स्पर्धेत लहान गटातून आर्या नात्ती, आमोस वाडेकर व गौरी आहेर आणि मोठ्या गटातून मारिया पटवेगार व श्रृती पानसरे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय पटकावला.

या कार्यक्रमास उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळाच्या अध्यक्षा रेखा वाळवेकर आणि सचिव स्वाती पालकर या उपस्थित होत्या. संस्थेचे कार्याध्यक्ष सुनील रेडेकर, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, माजी कार्याध्यक्ष प्राचार्य कृष्णाजी शिरकांडे, संचालक राजेंद्र बोर्हाडे, संचालक दिनेश मिसाळ मुख्याध्यापक राजेंद्र ढेंरगे, मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, राजकुमारी इंदलकर, मनीषा मुळीक सर्व शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



# तु. ह. वाजेकर यांचा उद्या जयंती महोत्सव

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

मिठागर कामगार यूनियनचे संस्थापक अध्यक्ष कै. तुकाराम हरी वाजेकर यांची बुधवारी (दि. ६) ११५वी जयंती आहे. या जयंती निमित्त सकाळी १० वाजता उरण पेठा मिठागर कामगार संघ कार्यालय कोटनाका उरण येथे ज्येष्ठ मान्यवर, चेअरमन, संचालक यांच्या उपस्थितीत जयंती महोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



उरण पेठा मिठागर कामगार संघ, उरण पेठा मिठ उत्पादक सहकारी मंडळ, उरण महाल सहकारी मजूर संघाचे सदस्य पदाधिकारी यांनी तसेच समस्त तू. ह. वाजेकर प्रेमी यांनी या जयंती महोत्सवास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



# नागोठणे एसटी बसस्थानकाचे झाले डबक्यात रूपांतर

**नागोठणे : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळ (एसटी)च्या नागोठणे येथील स्थानकाचे यावर्षीही पावसाळ्यात डबक्यात रुपांतर झाले आहे. या स्थानकाच्या प्रवेशद्वारावरच भला मोठा खड्डा पडला आहे, तर स्थानकाच्या आवारात लहान-मोठे दगड निघाले असून ते उडून जखमी होण्याच्या भीतीने प्रवासी जीव मुठीत घेऊन प्रवास करीत आहेत.



(छाया : राज वैशंपायन)

रायगड जिल्ह्यातील नागोठणे हे शहर मध्यवर्ती व महत्वाचे आहे. या ठिकाणाहून मुंबई, ठाणे, वसई, बोरीवली, रोहा, मुरुड, कर्जत, खोपोली, नाशिक, पुणे त्याचबरोबर श्रीवर्धन, चिपळूण, रत्नागिरी तसेच कोकणात जाण्यासाठी सोयीचा मार्ग जातो. या स्थानकातून दिवसभरात सुमारे १४५ ते १५० स्थानिक व लांब पल्ल्याच्या एसटी बसेस ये-जा करीत असून या सर्व बसेसमधून दररोज हजारो प्रवासी नागोठणे येथून प्रवास करीत असतात. त्यामध्ये शाळा, कॉलेजचे विद्यार्थी, महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांचा समावेश मोठ्या प्रमाणात आहे.

नागोठणे एसटी स्थानकाचा कारभार रोहा आगाराच्या अखत्यारित चालतो. पावसाळा नुकताच चालू झाला असला तरीही पाहिजे तसा पाऊस पडला नसतानाही नागोठणे स्थानकाच्या प्रवेशद्वारावरच भला मोठा खड्डा पडला असून त्याचे रुपांतर डबक्यात झाले आहे. तेथून ये-जा करताना प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत असून समोरून बस आली तर अंगावर खड्यातील पाणी उडणार या भीतीने पादचाऱ्यांची तारांबळ उडत आहे. त्याचप्रमाणे स्थानकात जागो-जागी पडलेल्या खड्ड्यांत पावसाचे पाणी साचून त्याचे रुपांतर लहान मोठ्या डबक्यात झाले आहे. त्यातून मार्ग काढीत प्रवासी एसटी बसमध्ये चढ-उतार करीत आहेत. यामध्ये महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना जास्त त्रास सहन करावा लागत आहे.

> **नागोठणे बस स्थानकांतील समस्यांबाबत रायगड विभागीय कार्यालयात पत्रव्यवहार करण्यात आला असून, तेथील स्थापत्य अभियंत्याकडे संपर्क साधून या बस स्थानकातील सर्व खड्डे लवकरात लवकर भरण्यात येतील.**
> **-सोनाली कांबळे, आगार व्यवस्थापक, रोहा**

नागोठणे एसटी स्थानकात सर्वत्र लहान-मोठे दगड-धोंडे निघाले असून ते उडून प्रवाशी जखमी झाल्यास त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न प्रवाशांकडून विचारला जात आहे. नागोठणे बस स्थानकातील खड्डे लवकरात लवकर बुजवून बाहेर आलेले दगड बाजूला करण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.



# नेरळ प्राधिकरणमधील ममदापूर नागरी वस्तीतील रस्ते हरवले खड्ड्यांत

**कर्जत : बातमीदार**

नेरळ-ममदापूर विकास प्राधिकरण क्षेत्रामधील ममदापूर गाव आणि परिसरातील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. या भागातील रस्त्यांची स्थिती खड्डेचखड्डे चहूकडे अशी झाली असून, या रस्त्यांच्या बाजूला असलेल्या गटारांची कामेदेखील कासवगतीने सुरू असल्याने स्थानिक रहिवाशी संतप्त झाले आहेत.

ममदापूर हे रायगड जिल्हा परिषदेच्या नेरळ विकास प्राधिकरण क्षेत्रातील महत्त्वाचे गाव आहे. या गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत असून नेरळ विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून विकसकांना जादा चटईक्षेत्र मिळत असल्याने ममदापूर परिसरात मोठ्या प्रमाणात रहिवाशी क्षेत्र उभे राहत आहे.

या परिसरात किमान दोन हजार नवीन घरांची निर्मिती झाली असून त्यांना सोयीसुविधा पुरविण्याची जबाबदारी नेरळ-ममदापूर विकास प्राधिकरणाची आहे. या प्राधिकरणाकडे मोठा निधी शिल्लक आहे. मात्र अनेक वर्षे डांबरीकरण आणि कॉँक्रीटीकरणाच्या प्रतीक्षेत असलेल्या ममदापूर भागातील रस्त्याची कामे प्राधिकरणाने केली नाहीत. त्यामुळे येथील रस्त्यावर खड्डेच खड्डे बघायला मिळत आहेत. या रस्त्यांवरुन चालणेदेखील अवघड झाले आहे.



(छाया : संतोष पेरणे)

# भाजप भटके विमुक्त मोर्चाच्या सहसंयोजकपदी तुकाराम आखाडे



**कर्जत : बातमीदार**

भाजप भटके विमुक्त मोर्चाच्या रायगड जिल्हा सहसंयोजकपदी माथेरानमधील तुकाराम बाबू आखाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर यांच्या हस्ते तुकाराम आखाडे यांना नुकताच नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

भटके विमुक्त जाती जमातीच्या न्याय्य हक्कासाठी सदैव कार्यरत राहण्याचा मनोदय आखाडे यांनी या वेळी व्यक्त केला. जिल्हा सहसंयोजकपदी नियुक्ती झाल्याबद्दल तुकाराम आखाडे यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## जिल्ह्यात सरासरी ३२ मिमी पाऊस

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ३२.४६ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. तसेच १ जूनपासून सोमवार (दि. ४) अखेर एकूण सरासरी ५५२.८४ मिमी पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. अलिबाग :- ६ मिमी, पेण - ३० मि.मी., मुरूड :- २० मि.मी., पनवेल :- ४५.२० मि.मी., उरण :- १३ मि.मी., कर्जत :- ४१.६० मि.मी., खालापूर :- ३५ मि.मी., माणगाव :- १० मि.मी., रोहा :- ४० मि.मी., सुधागड :- ४६ मि.मी., तळा :- २४ मि.मी., महाड :- ४७ मि.मी., पोलादपूर :- ४१ मि.मी, म्हसळा :- २९ मि.मी., श्रीवर्धन :- ११ मि.मी., माथेरान :- ८०.६० मि.मी.

# पोलादपूर एसटी स्थानकात सांडपाण्याच्या खड्डयावर बांधले नवे स्वच्छतागृह



**पोलादपूर : प्रतिनिधी**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) पोलादपूर बसस्थानकात असलेल्या गळक्या स्वच्छतागृहाच्या सांडपाण्यासाठी स्थानकाच्या आवारातच खणण्यात आलेल्या खड्ड्यावर नवीन स्वच्छतागृह बांधण्यात आले आहे.

पोलादपूर एसटी स्थानकातील स्वच्छतागृहाचे सांडपाणी पुर्वी मुंबई-गोवा महामार्गावरील गटाराला मिळण्यासाठी सिमेंटकॉँक्रीटचा पाईप टाकण्यात आला होता. मात्र, चौपदरीकरणाच्या कामात महामार्गालगतचे गटार फोडण्यात आल्यानंतर एसटी स्थानकातील स्वच्छतागृहाचे सांडपाणी स्थानकाच्याच आवारात शोषखड्डा खणून जिरविण्यास सुरूवात झाली. या शोषखड्ड्यावरच नवीन स्वच्छतागृहाची इमारत बांधण्यात आली आहे. या नवीन स्वच्छतागृहाच्या सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी काय उपाययोजना करावी, या संदर्भात महाड एसटी आगाराच्या वाहतूक नियंत्रकांनी पोलादपूर नगरपंचायतीबरोबर चर्चा केली आहे.

# पेण सरेभाग येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

कोएसोच्या नागोठणे येथील गु. रा. विद्यामंदिर शाळेचे माजी क्रीडा शिक्षक एल. डी. म्हात्रे यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त पेण तालुक्यातील सरेभाग येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

एसएससी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या सरेभाग गावातील विद्यार्थ्यांचा या वेळी गुणगौरव करण्यात आला. तृष्णा म्हात्रे (कारमेल स्कूल-पेण) हिचे विशेष कौतुक करण्यात आले. जो. ह. ठाकूर यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले. सरेभाग शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनिल म्हात्रे, गिरीश म्हात्रे यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# थोर साहित्यिक कै. र. वा. दिघे यांना खोपोलीत विनम्र अभिवादन

**खोपोली : प्रतिनिधी**

प्रसिद्ध ग्रामीण कादंबरीकार कै. र. वा. दिघे यांच्या ४२ व्या पुण्यतिथीनिमित्त कै. र. वा. दिघे साहित्य समिती व कोमसाप यांच्या संयुक्त वतीने सोमवारी (दि. ४) खोपोलीतील कै. र. वा. दिघे स्मारकात त्यांना अभिवादन करण्यात आले.



(छाया : विनायक माडे)

प्रारंभी ज्येष्ठ साहित्यिक यशवंत सकपाळ व पत्रकार नितीन भावे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कै. दिघे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. कोमसाप खोपोली शाखेचे उपाध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये र. वा. दिघे यांच्या साहित्याची तत्कालीन नामवंत साहित्यिकांनी जी दखल घेतली होती, त्याची विस्ताराने माहिती दिली. प्रसिद्धीपासून दूर राहिल्यामुळे खोपोलीकरांना र. वा. दिघे यांचे मोठेपण कळले नाही, याची खंत वाटत असल्याचे व्ही. डी. एम स्कूलचे संस्थापक उल्हासराव देशमुख यांनी सांगितले. रेखा कोरे, नितीन भावे, यशवंत सकपाळ यांचीही या वेळी समयोचित भाषणे झाली.

त्यानंतर कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सदस्यांनी निसर्गावर स्वरचित कविता सादर केल्या. शेवटी नरेंद्र हर्डीकर यांनी आभार मानले. खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे, कोमसाप खोपोली शाखा कार्याध्यक्ष नरेंद्र हर्डीकर, ब्राह्मण सभेचे अध्यक्ष अनिल रानडे, चिन्मय मिशनचे विजय घोसाळकर, जयमाला पाटील, डॉ. सुभाष कटकदौंड, निशा दळवी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# म्हसळा तालुक्यात कृषी दिन साजरा

## शेतकऱ्यांना भाजीपाला बियाण्याचे वाटप

**म्हसळा : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमीत्त म्हसळा तालुका पंचायत समिती कृषी विभाग आणि तालुका कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी कृषिदिन आणि कृषी संजीवनी मोहीम समारोप कार्यक्रम साजरा करण्यात आला.



(छाया : संजय खांबेटे)

स्थानिक शेतकऱ्यांनी भाजीपाल्याच्या बाबतीत तालुका स्वयंपूर्ण करावा आणि फळ प्रक्रिया करण्यावर भर द्यावा, असे आवाहन तहसीलदार समिर घारे यांनी या वेळी केले.

म्हसळा तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब गावडे यांनी शेतकरी, फळ बागायतदार यांना कृषी विभागाच्या योजनांची माहिती दिली. तसेच पंतप्रधान पिकविमा योजनेचे महत्त्व सांगितले. कृषी अधिकारी मंगेश साळी यांनी जिल्हा परिषदेच्या विविध योजनांची माहिती सांगताना सोलर कृषी विज पंप योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे सांगितले.

भातशेती बरोबरच शेतकऱ्यांनी आंबा,काजू, फणस, कोकम अशा फळबागायतीकडे वळावे, असे प्रतिपादन माजी कृषी सभापती बबन मनवे यांनी केले. पंचायत समितीच्या माजी सभापती छायाताई म्हात्रे, प्रगतीशील शेतकरी सुधिर कवीलकर, चंद्रकांत पवार यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी कृषी विभागाच्या माध्यमांतून उपस्थित शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते भाजीपाला बियाणे किटचे वाटप करण्यात आले. ग्रामपंचायत विस्तार अधिकारी सुनिल गायकवाड, प्रगतीशील शेतकरी समिर बनकर, संदीप चाचले, कृषी विभागाचे राजेंद्र ढंगारे, भरत कदम, सुजय कुसळकर, धनंजय सरनाईक, गणेश देवडे यांच्यासह तालुक्यातील शेतकरी या वेळी उपास्थित होते. पं. स.च्या आवारात वृक्षारोपण करून या कार्यक्रमाचा समारोप झाला.

# सामाजिक कार्यकर्ते किशोर पाटील यांच्या कारला अपघात

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर बापगाव येथे सोमवारी (दि. ४) दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास आरटीया या कारला अपघात झाला. त्यात लवजी खोपोली येथील सामाजिक कार्यकर्ते किशोर पाटील जखमी झाले. त्यांना खोपोलीतील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

किशोर पाटील हे आपल्या कारमध्ये सीएनजी भरण्यासाठी सोमवारी दुपारी विणेगाव येथे आले होते, ते परत जात असताना तुफान पावसामुळे बापदेव हद्दीत त्यांची कार अनियंत्रित झाल्याने दुभाजकाला ठोकून कार रस्त्याच्या कडेला गेली. या अपघातात पाटील यांच्या डोक्याला जखमा झाल्या आहेत. त्यांना प्रारंभी खोपोली नगर परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र डोक्याला गंभीर दुखापत असल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



# केरळ ते मक्का पायी प्रवासासाठी निघालेला सिहाबुद्दीन छोटुरचे माणगावात स्वागत

**माणगाव : प्रतिनिधी**

मलपुरम (केरळ) ते मक्का मदिना असा पायी प्रवासासाठी निघालेल्या सिहाबुद्दीन छोटुरचे सोमवारी (दि. ४) सकाळी १० वाजता माणगाव नगरीत आगमान झाल्यानंतर येथील मुस्लिम बांधवांनी त्याचे जोरदार स्वागत केले.



(छाया : सलीम शेख)

सिहाबुद्दीन छोटुर हा ३० वर्षीय तरुण मलपुरम येथून मक्का मदिनाला जाण्यासाठी २ जून २०२२ रोजी आपल्या घराबाहेर पडला. मलपुरम ते मक्का मदिना हे अंतर आठ हजार ६७० किमी असून, हे अंतर चालत इरान, कुवेत, सौदी अरेबिया असा आठ महिन्यात पुर्ण करून जानेवारी २०२३ पर्यंत मक्का मदिना या ठिकाणी पोहचण्याचा मानस त्याने व्यक्त केला. त्याचे सोमवारी माणगावात आगमन झाले. माणगाव, लोणशी, नाणोरे, मोर्बा, निजामपूर आदी गावांसह तालुक्यातील बहुसंख्य मुस्लिम बांधवांनी त्याचे स्वागत केले. त्यानंतर हाजीताहीर मंजिल माणगाव येथे पाऊण तास विश्रांती घेतल्यावर तो आपल्या पुढील प्रवासासाठी निघाला. त्यावेळी तालुक्यातील अनेक मुस्लिम बांधवांनी माणगाव नगरपंचायत हद्दीपर्यंत त्याच्या सोबत चालत जाऊन त्याला पुढील प्रवासासाठी मुबारक बात (शुभेच्छा) दिल्या.

# भारताकडे मोठी आघाडी

## पाचव्या कसोटीत इंग्लंडपुढे ३७८ धावांचे आव्हान

**बर्मिंगहम : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेली एजबस्टन कसोटी रंगतदार स्थितीमध्ये आली आहे. भारताने सोमवारी (दि. ४) चौथ्या दिवशी आपल्या दुसऱ्या डावात सर्वबाद २४५ धावा केल्या. त्यामुळे भारताकडे ३७७ धावांची आघाडी आली आहे. हे इंग्लंडला दुसऱ्या डावात मिळालेले सर्वांत मोठे लक्ष्य आहे. आतापर्यंत इंग्लंडचा कसोटी संघ एवढे मोठे लक्ष्य यशस्वीपणे पार करू शकलेला नाही.

अर्धवट राहिलेली कसोटी मालिका पूर्ण करण्यासाठी भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर गेला आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना एजबस्टन क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जात आहे. या सामन्याच्या चौथ्या दिवशी भारताने आपला दुसरा डाव ३ बाद १२५ धावांपासून पुढे खेळण्यास सुरुवात केली. भारताने पहिल्या सत्रात आक्रमक





फलंदाजी करीत आघाडी वाढवण्याचा प्रयत्न केला. भारताची धावसंख्या १५३ अशी असताना सलामीवीर चेतेश्वर पुजारा ६६ धावांवर बाद झाला. त्यानंतर उपकर्णधार ऋषभ पंतने दुसऱ्या डावातही चमकदार कामगिरी केली. त्याने ७६ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. पहिल्या डावात त्याने १४६ धावांची अप्रतिम खेळी केली होती.

भारताच्या १९० धावा झाल्या असताना श्रेयस अय्यर १९ धावा करून मॅथ्यू पॉट्सच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर पंतही माघारी परतला. मग शार्दुल ठाकूर आणि रवींद्र जडेजा यांनी भारताला २००च्या पार पोहचवले, मात्र शार्दुलला फक्त चार धावांचे योगदान देता आले.


यानंतर जडेजा आणि मोहम्मद शमीने भारताला उपराहापर्यंत सात बाद २२९ धावांपर्यंत पोहचवले, मात्र मोहम्मह शामी १३ धावा करून माघारी परतला. जडेजा खेळपट्टीवर जम बसवत असल्याचे दिसताच कर्णधार बेन स्टोक्सने त्याला त्रिफळाचित केले. जडेजा २३ धावा करून बाद झाला. एजबस्टन कसोटीतील दुसऱ्या डावात कर्णधार जसप्रीत बुमराह भारताचा दहावा गडी बाद झाल्यानंतर भारताने सर्वबाद २४५ धावा केल्या. भारताने इंग्लंडला ३७८ धावांचे लक्ष्य दिले आहे. त्यामुळे इंग्लंडला हा सामना जिंकायचा असेल तर त्यांना ऐतिहासिक खेळी करावी लागेल.

# विम्बल्डन टेनिस स्पर्धेत त्सित्सिपासचा पराभव

## नदाल, बदोसा, रायबाकिनाची आगेकूच

**लंडन : वृत्तसंस्था**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा खेळाडू निक किरियॉसने दमदार पुनरागमन करीत चौथ्या मानांकित स्टेफानोस त्सित्सिपासचा पराभव करून उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. याशिवाय पुरुषांमध्ये २२ ग्रँडस्लॅम विजेता राफेल नदाल, तर महिलांमध्ये चौथ्या मानांकित पॉला बदोसा आणि १७व्या मानांकित एलेना रायबाकिना यांनीही विजयी आगेकूच केली.



पुरुष एकेरीच्या चौथ्या फेरीच्या सामन्यात किरियॉसने ग्रीसच्या त्सित्सिपासवर चार सेटमध्ये मात केली. या सामन्यात दोन्ही खेळाडूंना गैरवर्तनामुळे पंचांनी ताकीदही दिली. त्सित्सिपासने पहिला सेट टायब्रेकरमध्ये जिंकल्यानंतर किरियॉसने आपल्या खेळाची गती वाढवली तसेच सर्व्हिस करताना त्याने दोन गुणांच्या दरम्यान त्सित्सिपासला तयार होण्यासाठी फारसा वेळही दिला नाही. याचा त्सित्सिपासवर नकारात्मक परिणाम झाला. याचा फायदा घेत किरियॉसने पुढील तिन्ही सेट जिंकत उपउपांत्यपूर्व फेरी गाठली.

स्पेनच्या नदालने इटलीच्या लोरेंझो सोनेगोला सरळ सेटमध्ये पराभूत केले. पुढील फेरीत नदालपुढे नेदरलंड्सच्या बोटिक व्हॅन डी झँडशूल्पचे आव्हान असेल. झँडशूल्पने तिसऱ्या फेरीत फ्रान्सचा अनुभवी खेळाडू रिचर्ड गॅस्केचा पराभव केला. ब्रिटनच्या कॅमरून नॉरीने अमेरिकेच्या टॉमी पॉलला सरळ सेटमध्ये नमवत उपांत्यपूर्व फेरी गाठली.

महिलांमध्ये स्पेनच्या बदोसाने पेट्रा क्विटोव्हाला नमवत उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला. कझाकस्तानच्या रायबाकिनाने चीनच्या क्विनवेन झेंगवर मात करीत आगेकूच केली. जर्मनीच्या तात्जाना मारिआने लॅटवियाच्या एलिना ओस्टापेन्कोला पराभूत करत उपांत्यपूर्व फेरी गाठली. भारताची सानिया मिर्झा आणि तिचा क्रोएशियाचा साथीदार मॅट पॅव्हिचने मिश्र दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला.

# राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेत सुरेश डुबल यांचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील कळंबोली येथील सुरेश डुबल यांनी कानपूर येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेत सुयश प्राप्त केले आहे.

उत्तर प्रदेशमधील कानपूर येथे १९ ते २२ जूनदरम्यान राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धा झाली. या स्पर्धेत कळंबोली सेक्टर ५ येथील सुरेश डुबल यांनी ९५ किलो वजनी गटात सहभाग घेतला होता. त्यात त्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविला. त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत असून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# महिला विश्वचषक हॉकी स्पर्धा

## भारत-इंग्लंड सामना बरोबरीत

**ॲमस्टेलव्हीन : वृत्तसंस्था**

महिला विश्वचषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघाने पिछाडीवरून पुनरागमन करीत इंग्लंडविरुद्धचा ब-गटातील सलामीचा सामना १-१ असा बरोबरीत सोडवला. इंग्लंडकडून इसाबेला पीटरने नवव्या मिनिटाला, तर भारताकडून वंदना कटारियाने २८व्या मिनिटाला गोल केला.

भारताला पहिल्याच मिनिटाला पेनल्टी कॉर्नरला मिळाला, पण त्यांना गोल करता आला नाही. यानंतर पीटरने भारताच्या बचाव फळीला चकवत चेंडू गोल जाळ्यात मारला आणि इंग्लंडला आघाडी मिळवून दिली. मग २८व्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला. या वेळी कटारियाने संधीचा फायदा घेत गोल करीत



भारताला १-१ अशी बरोबरी साधून दिली.

भारताने अखेरच्या सत्रात गोल करण्याचे प्रयत्न वाढवले, मात्र त्यांना यश मिळाले नाही. आता भारताचा पुढील सामना मंगळवारी (दि. ५) चीनशी होणार आहे.

# पिरकोन प्रीमिअर लीग उत्साहात

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या आम्ही पिरकोनकर समुहाच्या वतीने रविवारी (दि. ३) पिरकोन प्रीमिअर लीग या ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले.

पावसाळी वातावरणात रंगलेल्या या स्पर्धेत एकूण आठ संघांनी सहभाग घेतला. शानदार खेळ करत केमंता स्पोर्ट्स हा संघ विजेता ठरला, तर अल्पेश-रामचंद्र स्पोर्ट्स या संघाला उपविजेतेपद प्राप्त झाले. सामान्यात उत्कृष्ट गोलंदाज मंगेश लक्ष्मण पाटील तर उत्कृष्ट फलंदाज आणि मालिकवीराचा किताब प्रसाद मधुकर



गावंड यास मिळाला.

क्रिकेट स्पर्धेद्वारे प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग परिसरातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य वाटप करणे, शालेय विद्यार्थ्यांसाठी बॉटॅनिकल गार्डनची निर्मिती करण्यासाठी होणार आहे. परिसरातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी स्पर्धेस भेट दिली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आम्ही पिरकोनकर समुहाच्या सर्व सदस्यांनी मेहनत घेतली.

# ‘त्या’ कृतीबद्दल निक किर्गिओसला भरावा लागणार लाखो रुपयांचा दंड

**लंडन : वृत्तसंस्था**

विम्बल्डन ग्रँडस्लॅम स्पर्धेत ऑस्ट्रेलियन टेनिसपटू निक किर्गिओसने प्रेक्षकांसोबत गैरवर्तन केले आहे. याची शिक्षा म्हणून त्याला १० हजार डॉलर्स म्हणजे अंदाजे आठ लाख रुपये दंड भरावा लागणार आहे. या स्पर्धेतील हा आतापर्यंतचा सर्वांत मोठा दंड आहे. याशिवाय या स्पर्धेत सहभागी झालेल्या अन्य १३ खेळाडूंनाही दंड ठोठावण्यात आला आहे.

निक किर्गिओस सामन्यादरम्यान प्रेक्षकांवर थुंकला होता. स्पर्धेच्या पहिल्या फेरीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्याने याबाबत कबुली दिली. त्यानंतर



त्याला ऑल इंग्लंड टेनिस क्लबने शिक्षा म्हणून दंड आकारला आहे. किर्गिओसच्या आधी स्वीडिश टेनिसपटू अलेक्झांडर रिटशार्डला या स्पर्धेत पाच हजार डॉलर्सचा दंड ठोठाविण्यात आला होता.

विशेष म्हणजे निकला दंड झाल्याचे अजिबात वाईट वाटलेले नाही. त्याने पत्रकार परिषदेत असेही सांगितले की, त्याने आतापर्यंतच्या कारकिर्दीत सुमारे ६.३ कोटी रुपये दंड भरला आहे. माझ्यावर लावलेला प्रत्येक दंड धर्मादाय म्हणून वापरला जातो. त्यामुळे मला त्याचे वाईट वाटत नाही, असे तो म्हणाला.

ऑल इंग्लंड टेनिस क्लबने विम्बल्डन स्पर्धेत भाग घेणाऱ्या इतर सात पुरुष टेनिसपटूंना प्रत्येक तीन हजार डॉलर्सचा दंड ठोठावला आहे. या खेळाडूंवर खेळभावनेच्या विरुद्ध वर्तन किंवा अश्लील शब्द उच्चारल्याचे आरोप सिद्ध झाले आहेत. याशिवाय एकूण पाच महिला खेळाडूंनाही दंड ठोठावण्यात आला आहे. रॅकेट किंवा इतर उपकरणे फेकल्याबद्दल त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात आला आहे.

# माजी प्रशिक्षकाने केले बुमराहचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या एजबस्टन कसोटीच्या दुसऱ्या दिवशी भारतीय कर्णधार जसप्रित बुमराहने धमाकेदार कामगिरी केली. त्याने इंग्लिश गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉडच्या एका षटकात ३५ धावा फटकावल्या. शिवाय गोलंदाजी करतानाही तीन बळी मिळवले. त्याच्या या कामगिरीचे भारताचे माजी क्षेत्ररक्षण प्रशिक्षक आर. श्रीधर यांनी कौतुक केले आहे.

याबाबत ते म्हणाले की, जसप्रीत बुमराह हा सर्वांत चांगला विद्यार्थी आहे. जेव्हा महेंद्रसिंह धोनीच्या ड्रेसिंग रूममध्ये किंवा मैदानावर काही सूचना तसेच



प्रशिक्षकांच्या सल्ल्याबाबत बुमराह सर्व गोष्टी ऐकत असे.

एजबस्टन कसोटीतील दुसऱ्या दिवशी भारताच्या डावातील ८४वे षटक स्टुअर्ट ब्रॉड टाकत होता. या षटकात जसप्रित बुमराहने ४, ५, ७, ४, ४, ४, ६, १ अशी फटकेबाजी करीत तब्बल ३५ धावा फटकावल्या. अशी कामगिरी करून बुमराहने कसोटी क्रिकेटमध्ये इतिहास रचला आहे.

# सचिन, युवराजकडून हरभजन सिंगला शुभेच्छा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघातील अनेक आजी-माजी खेळाडू चांगले मित्र असून ते एकमेकांच्या संपर्कात राहून भावना व्यक्त करीत असतात. अशाच प्रकारे मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर आणि अष्टपैलू खेळाडू युवराज सिंग यांनी त्यांचा एकेकाळचा सहकारी हरभजन सिंगला वाढदिवसदानिमित्त खास पद्धतीने शुभेच्छा दिल्या. दोघांनीही आपापल्या सोशल मीडियावर भज्जीचे व्हिडीओ शेअर केले आहेत.



हरभजनच्या वाढदिवसानिमित्त युवराज सिंगने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत त्याने भज्जीसोबत घालवलेले खास क्षण दाखवले आहेत. युवराजचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडीओच्या कमेंटबॉक्समध्ये अनेक चाहत्यांनी हरभजनला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

युवराजप्रमाणे सचिन तेंडुलकरनेदेखील आपल्या ट्विटर अकाऊंटवर हरभजनचा एक जुना व्हिडीओ पोस्ट केला आहे. हा व्हिडीओ २००१मधील भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यातील आहे. कोलकात्यामध्ये झालेल्या या सामन्यात भज्जीने पहिल्यांदा कसोटी क्रिकेटमध्ये हॅट्ट्रिक घेतली होती. हा व्हिडीओ शेअर करून सचिनने हरभजनला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# विम्बल्डनच्या सेंटर कोर्टला १०० वर्षे पूर्ण



**लंडन : वृत्तसंस्था**

जगातील प्रतिष्ठित ग्रँडस्लॅमपैकी एक असलेल्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेतील सेंटर कोर्टला रविवारी १०० वर्षे पूर्ण झाली. लंडनमधील चर्च रोड परिसरात असलेल्या ऑल इंग्लंड लॉन टेनिस संघटनेच्या सेंटर कोर्टवर १९२२पासून सामने खेळवले जात आहेत.

विम्बल्डन स्पर्धेतील रविवार हा परंपरेनुसार आरामाचा दिवस असतो. यंदा मात्र या नियमाला बाजूला सारत टेनिस सामने झाले आणि या दरम्यान सेंटर कोर्टची शंभरी साजरी करण्यासाठी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत एका कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या वेळी रॉड लेव्हर, जॉन मॅकि न्रो, राफेल नदाल, गतविजेता नोव्हाक जोकोव्हिच, अँडी मरे, ख्रिस एव्हर्ट, सिमोना हालेप आदी दिग्गज आणि माजी विजेते खेळाडू उपस्थित होते.

# विराट-बेअरस्टोच्या वादावर सेहवागने केले मजेशीर ट्वीट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाचव्या कसोटीदरम्यान भारताचा माजी कर्णधार विराट कोहली आणि इंग्लंडचा फलंदाज जॉनी बेअरस्टोमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्यानंतर बेअरस्टोने कसोटी कारकिर्दीतील ११वे शतक पूर्ण केले. याबाबत माजी भारतीय फलंदाज विरेंद्र सेहवागने मजेशीर ट्वीट केले आहे. त्याचे हे ट्वीट व्हायरल झाले असून चाहत्यांनी त्यावर लाईक्स आणि कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.

भारत आणि इंग्लंडदरम्यान पतौडी चषक स्पर्धेतील पाचवा आणि निर्णयक सामना एजबस्टन येथे खेळवला जात आहे. या सामन्यातील तिसऱ्या दिवसाचा खेळ वेळेत सुरू झाला, मात्र सुरुवातीलाच विराट कोहली आणि जॉनी बेअरस्टो यांच्यात वाद झाला. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये भारताचा माजी कर्णधार हातवारे करताना दिसला. त्यानंतर त्याने बेअरस्टोला गप्प राहण्याचाही इशारा केला. हा वाद झाल्यानंतर बेअरस्टोने अचानक आपल्या खेळाची गती वाढवली. ही गोष्ट



लक्षात घेऊन सेहवागने एक ट्वीट केले आहे. ‘विराट कोहलीने स्लेजिंग करण्यापूर्वी बेअरस्टोचा स्ट्राईक रेट २१ होता. स्लेजिंगनंतर तो १५० झाला. बेअरस्टो पुजारासारखा सावकाश खेळत होता. त्याच्यासोबत वाद घालून कोहलीने त्याला पंतप्रमाणे फटकेबाजी करण्यास प्रवृत्त केले,’ अशा आशयाचे ट्वीट सेहवागने केले आहे.




हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अ‍ॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अ‍ॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

“Printed and Published by Krishna Changu Thakur on behalf of Malhar Network Pvt. Ltd. and Printed at Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra and published from Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale